नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १६२ * * अकोला * | सोमवार, दिनांक १५ डिसेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## एमटीडीसीचे ४५० कोटींचे अनुदान पडून

■ वृत्तसंस्था, मुंबई, दि. १४ :

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या आर्थिक शिस्तीबाबत लेखा परीक्षकांनी अत्यंत गंभीर आक्षेप नोंदवले आहेत. केंद्र आणि राज्य सरकारकडून मिळालेले तब्बल ४५० कोटी रुपयांचे भांडवली अनुदान वापराविना पडून असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

विशेष म्हणजे महामंडळाच्या मालकीच्या जमिनी आणि मालमत्तांची कोणतीही अधिकृत कागदपत्रे किंवा नोंदी उपलब्ध नसल्याचे ऑडिटर्सनी आपल्या अभिप्रायात म्हटले आहे. महामंडळाचा २०२०-२१ या वर्षाचा ४६ वा वार्षिक अहवाल नुकताच विधानसभेत सादर करण्यात आला असून, यामुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

अग्रअग्रलेख

खरीखरी...

## देवा भाऊंना यश लाभो !

आज आपल्या मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे दाखवून दिले आहे की, देवाभाऊच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. विदर्भावर अन्याय, अन्याय आणि अन्याय झाला म्हणून जे सतत बोलले त्यात सत्य आहे. पण म्हणून नागपूर किंवा विदभार्चा मुख्यमंत्री आहे म्हणून त्यांनी सर्व काही विदर्भाला द्यावे अशी जर काही मंडळींची अपेक्षा असेल तर निश्चितपणे ती चुकीची आहे. स्वर्गीय वसंतराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते त्यावेळी महाराष्ट्रात जे काही करायचे होते ते त्यांनी केले. त्यांनाही असेच प्रश्न विचारले जात होते. त्यावेळी पश्चिम महाराष्ट्राचे मंत्री किंवा आमदार अतिशय कौशल्याने आपली बाजू मांडून त्यांच्या भागाच्या विकासाची वाट मोकळी करून घेत होते. विदर्भाचे आमदार किंवा मंत्री त्यावेळी फारसे काही करू शकले नाहीत ही वस्तुस्थिती आहे, मग त्यावेळी एका दिवशी नागपुरात काही पत्रकारांनी याबाबत त्यांना प्रश्न विचारल्यावर त्यांनी अगदी स्पष्टपणे मान्य केले होते की, मी जरी विदर्भाचा असलो तरी कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र, यासह पुणे, मुंबई सारख्या शहरांचा आणि एकूणच सर्वांगीण महाराष्ट्राचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. कदाचित त्या काळी सरकार आणि विरोधी पक्ष या दोघांमध्ये सौजन्य होते. राजकीय दृष्ट्या अनेक बाबी विदर्भासाठी फायदेशीर ठरल्या नव्हत्या पण विदर्भाचा हा स्वभाव आहे की, केवळ आपल्या पुरते न पाहता 'हे विश्वचि माझे घर' अशा विश्वबंधुत्वाच्या भावनेने कार्य करणारे नेते आपण बघितलेले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी विदभार्ला बरेच काही दिले आहे. विदर्भाच्या विकासाबद्दल जी काही नकारघंटा असते. त्याबाबतची आकडेवारी त्यांनी आज जाहीर केली. विकास निधीच्या 12 लाख 72 हजार कोटींपैकी पाच लाख कोटी रुपयांची गुंतवणूक फक्त विदर्भासाठी करण्यात आलेली आहे. अवकाश आणि संरक्षण साहित्य निर्मितीमध्ये वीस हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झालेली आहे. विशेष म्हणजे त्यातून 15 ते 20 हजार लोकांसाठी रोजगार निर्मिती होणार आहे. देवाभाऊंनी सोलर मध्ये विदर्भाला एक क्रमांकावर घेऊन ठेवण्याचे ठरवलेले आहे. त्यासोबतच ईव्ही म्हणजेच इलेक्ट्रिक व्हेईकल निर्मितीमध्ये छत्रपती संभाजी नगर आणि मराठवाड्यात 50 हजार कोटींची गुंतवणूक आलेली आहे. तिथे सुद्धा 50 ते 60 हजार बेरोजगारांना नोकऱ्या मिळतील. नागपूरच्या मिहान मध्ये रोजगार नाही असा आरोप करणाऱ्या लोकांना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की मिहान मध्ये एकूण 31 कंपन्या कार्यरत आहेत आणि अजून 22 कंपन्या सुरू होणार आहेत. आयटीच्या क्षेत्रातले जे बिग सिक्स आहेत ते सगळेच्या सगळे इथेच आहेत. अशा दूरदर्शी गोष्टी केल्यामुळे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे जवळपास सव्वा लाख लोकांच्या रोजगाराची तजवीज होणार आहे. त्यासोबतच विमानतळाचे काम सुरू झाले असल्याची माहिती देवा भाऊंनी दिली. शक्तीपीठ महामार्गाचे रेखांकन बदलण्यासोबतच विदर्भ मराठवाड्याला त्याचा फायदा होणार आहे हे त्यांनी आवर्जून नमूद केलेले आहे. विशेष म्हणजे शेतकऱ्यांसाठी पंधरा हजार सात कोटी रुपयांची थेट मदत शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष खात्यात गेली आहे हे नमूद करायला आपले मुख्यमंत्री म्हणजेच देवा भाऊ विसरले नाहीत. 27000 विहिरींच्या दुरुस्तीकरता 80 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याची माहिती देवा भाऊंनी विधानसभेत समारोपाच्या वेळी दिली. म्हणजे प्रगतीच्या दिशेने समतोल साधणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांच्या सर्व विभाग समन्वयाचा विचार विदर्भाच्या जनतेनेही नीट समजून घेतला पाहिजे. महाराष्ट्र प्रगत आहे असे आपण म्हणतो पण ही प्रगती मुंबई आणि महाराष्ट्राच्या आठ ते नऊ जिल्ह्यांपुरती मर्यादित आहे. ही गोष्ट सुद्धा लक्षात घेण्यासारखी आहे. या सर्व बाबींचा विचार केला तर महाराष्ट्राला प्रगतीच्या दिशेने नेताना अनेक बाबींचा विचार करणे गरजेचे आहे. त्यासाठी केंद्राचे सहकार्यही तितकेच महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राने शेतक?यांच्या कर्जमाफीसाठी मागणी प्रस्ताव सादर केल्यावरही तो प्रस्ताव आलाच नाही असे केंद्र सरकारचे कृषिमंत्री म्हणतात यातच सर्वकाही आले. दोन इंजिनांचे सरकार असतानाही जर अशी परिस्थिती असली तर सिंगल इंजिनचे सरकार असल्यावर विचारुच नका. आपल्याला प्रगतीच्या वाटेवर जाण्यासाठी उद्योगधंदे वाढवले पाहिजेत. परंतु गंमत अशी आहे की उद्योगधंदे वाढण्याऐवजी ते कमी होत आहेत. उच्च विद्याविभूषित लोकांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणे रोजगार किंवा पगार मिळत नाही. एखादा उद्योग सुरू केला तर त्यातून नफा होईलच याची शाश्वती नसते. सर्वसामान्य माणसांनी कर्ज घेतले आणि जर ते त्याला फेडता आले नाही तर तो पार उध्वस्तच होतो. आताची अशी परिस्थिती आहे की केवळ सरकारच्या भरवशावर नोकऱ्यांची गाडी चालेल अशी स्थिती नाही. महत्त्वाचा मुद्दा हा आहे की महाराष्ट्राचा जुना वैभवशाली काळ आता नाही ही वस्तुस्थिती आपण मान्य केली पाहिजे. अशा परिस्थितीमध्ये मुख्यमंत्र्यांनी आवाहन केलेले आहे आणि आव्हान झेलले आहे. हे आवाहन आणि आव्हानांची शर्यत योग्य मार्गाने पुढे गेली तर आपण निश्चितच जिंकू शकतो याबद्दल तीळमात्र संशय नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दाखवलेल्या सकारात्मकतेला आपण सर्व तसेच सरकारी यंत्रणा आणि त्याबरोबरच मायबाप दिल्ली दरबारानेही मदत केली, तर हे राज्य पुन्हा पूर्वीच्या दिमाखाने उभे राहील यात शंका बाळगण्याचे कारण नाही. देवा भाऊ यांना यामध्ये यश लाभो. ते यशस्वी ठरोत, हीच आमची कामना आहे!


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# अधिवेशनाचे सूप वाजले

## कर्जमाफीचा फायदा शेतकऱ्यांना झाला पाहिजे, बँकांना नाही : मुख्यमंत्री



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

नागपुरात सुरू असलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा रविवार हा शेवटचा दिवस होता. अधिवेशनाच्या समारोपाच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा पार पडली.

अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरोधकांनी केलेल्या आरोपांना आणि उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. विधानसभेचे पुढील अधिवेशन २३ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईत होणार आहे.

कर्जमाफीच्या मुद्द्यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्य सरकारने कमिटमेंट केली आहे. आपल्यावर सध्या अतिवृष्टीचा ताण आलेला आहे. त्यामुळे आपलं बजेट अडचणीत आहे. या सगळ्या गोष्टी असल्या तरी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत निर्णय आपण घोषित केलेला आहे. कुठल्याही परिस्थितीत कर्जमाफीचा फायदा शेतकऱ्यांना झाला पाहिजे, बँकांना नाही.

आपण कर्जमाफी केली तरीदेखील आपला शेतकरी हा आज कर्जमाफी मागत आहे. याचा अर्थ कुठेतरी आपल्या नियोजनात अडचण आहे. आपल्या कर्जमाफीतही आहे आणि शेतकऱ्यांच्या परिस्थितीत देखील आहे. त्यामुळे यावर एकदम उपाययोजना होणार नाहीत. पण हळूहळू टप्प्याटप्प्याने काय उपाययोजना करता येतील आणि त्या उपाययोजनेतला एक भाग म्हणून कर्जमाफी अशा पद्धतीने समिती काम करत आहे.

▶▶ पान २ वर


Ministry of Road Transport & Highways, Govt. India
PUBLIC WORKS DEPARTMENT PWD




भूमिपूजन समारंभ

महाराष्ट्र राज्यातील नागपूर-जबलपूर मार्गावरील जुना राष्ट्रीय महामार्ग क्र. 44 अंतर्गत नागपूर शहरात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया चौक ते ऑटोमोटिव्ह चौक मेट्रो स्थानकापर्यंत चार पदरी सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम.
लांबी : 6.14 कि. मी. । किंमत : 150 कोटी
दिनांक : सोमवार, 15 डिसेंबर 2025 । वेळ : 10.00 वाजता
स्थळ : गड्डीगोदाम चौक, सदर, कामठी रोड, नागपूर

महाराष्ट्र राज्यातील नागपूर भंडारा रोड (जुना राष्ट्रीय महामार्ग) वरील राम मंदिर ते प्रजापती नगर पर्यंतच्या सेंट्रल एव्हेन्यू रस्त्याचे काँक्रीट व्हाईट टॉपिंगसह सुधारणा आणि पदपथ आणि सायकल ट्रॅकचे पुनरुज्जीवन.
लांबी : 6.1 कि. मी. । किंमत : 150 कोटी
दिनांक : सोमवार, 15 डिसेंबर 2025 । वेळ : 11.00 वाजता
स्थळ : टेलीफोन एक्सचेंज चौक, सीए रोड, नागपूर

प्रकल्पांचे फायदे

कामठी रोड आणि सी.ए. रोडवरील प्रमुख चौकांवर सुरक्षेत वाढ.
गुरुद्वारा श्री गुरु सिंग सभाजी परिसर, गड्डीगोदाम, टेकानाका क्षेत्र आणि सी.ए. रोडवरील पाण्याची तुंबळ समस्या दूर करण्यासाठी रस्त्यालगत काँक्रीट ड्रेनेजची उभारणी व जलनिकासी व्यवस्थेत सुधारणा.
प्रस्तावित रस्त्यांमुळे उत्तम रस्त्यांची रचना आणि योग्य वाहतूक व्यवस्थापन सुविधांमुळे वाहतुकीची सुरक्षितता वाढणार.
कडबी चौक ते ऑटोमोटिव्ह चौक आणि सी.ए. रोडवर स्वतंत्र सायकल ट्रॅक.
रस्त्याच्या दोन्ही बाजूंना स्वतंत्र पादचारी मार्ग.
स्ट्रीट लाईट्स व स्पष्ट वाहतूक चिन्हांमुळे वाहतुकीची सुरक्षा आणि एकूणच सुरक्षेत वाढ.



शुभहस्ते
मा. ना. श्री. नितीन गडकरी
केंद्रीय मंत्री, रस्ते परिवहन, महामार्ग, भारत सरकार

प्रमुख अतिथी
मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे
मंत्री, महसूल, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री नागपूर जिल्हा
मा. ना. श्री. शिवेंद्रसिंह भोसले
मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), महाराष्ट्र राज्य



विशेष उपस्थिती
मा. ना. ॲड. आशिष जयस्वाल
राज्यमंत्री, वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधि व न्याय, कामगार, महाराष्ट्र राज्य

मा. श्री. अभिजीत वंजारी, विधान परिषद सदस्य | मा. श्री. सुधाकर अडबाले, विधान परिषद सदस्य | मा. डॉ. परिणय फुके, विधान परिषद सदस्य | मा. श्री. कृपाल तुमाने, विधान परिषद सदस्य | मा. श्री. संदीप जोशी, विधान परिषद सदस्य
मा. डॉ. नितीन राऊत, आमदार (उत्तर नागपूर) | मा. श्री. कृष्णा खोपडे, आमदार (पूर्व नागपूर) | मा. श्री. प्रविण दटके, आमदार (मध्य नागपूर) | मा. श्री. मोहन मते, आमदार (दक्षिण नागपूर) | मा. श्री. विकास ठाकरे, आमदार (पश्चिम नागपूर)

@nitingadkary @officeOfNG @nitin_gadkari @OfficeOfNG @gadkari.nitin gadkari.nitin Nitin Gadkari


## नागपूर अधिवेशन 'वांझोटे'

### विरोधकांनी डागली सरकारवर तोफ



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

नागपूर येथील सात दिवसीय हिवाळी अधिवेशनाची आज सांगता झाली, मात्र सात दिवस चाललेल्या या अधिवेशनात विदर्भाच्या पदरात काहीच पडले नसल्याने विरोधकांनी सरकारवर सडकून टीका केली आहे.

हे अधिवेशन निवडणुकीचा जुमला' असून, सरकारने विदर्भातील जनतेच्या तोंडाला पाने पुसली आहेत," अशा शब्दांत वडेट्टीवार आणि भास्कर जाधव यांनी सरकारचा समाचार घेतला.

▶▶ पान २ वर

## वडाळा विभागातील अतिक्रमणावर कडक कारवाई : योगेश कदम



**नागपूर :** वडाळा विभागातील अतिक्रमण, त्यामागील साखळी तसेच बांगलादेशी घुसखोरांच्या वास्तव्यास आळा घालण्यासाठी राज्य शासनाने ठोस उपाययोजना आखल्या असून, गुगल मॅपिंग व गृह विभागाच्या संयुक्त कारवाईद्वारे अतिक्रमण रोखले जाईल, अशी माहिती गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत दिली. सदस्य प्रसाद लाड यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. उत्तर देताना गृह राज्यमंत्री कदम बोलत होते.गृह राज्यमंत्री कदम म्हणाले की, २०१२ मध्ये स्थापन झालेल्या कांदळवन विभागांतर्गत मुंबई, ठाणे व पालघर जिल्ह्यांचा समावेश असून, सध्या या विभागात १८४ जवान कार्यरत आहेत. मात्र, आतापर्यंत अतिक्रमणाच्या मुद्द्यावर गृह विभाग व संबंधित विभागाची संयुक्त कारवाई झालेली नव्हती. अतिक्रमण आणि त्या अतिक्रमणातून उभ्या राहिलेल्या वस्त्यांची विक्री बेकायदेशीररीत्या भारतात आलेल्या व्यक्तींना करण्यात आल्याचे गंभीर प्रकार लक्षात आल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी संपूर्ण कांदळवन विभागाचे गुगल मॅपिंग करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, पुढील सहा ते आठ महिन्यांत २०१२ पूर्वीपासून सुरू असलेल्या अतिक्रमणांची अचूक माहिती संकलित केली जाणार आहे. १५ व १६ डिसेंबर रोजी कांदळवन वडाळा परिसरात गृह विभागाच्या संयुक्त कारवाईचे नियोजन करण्यात आले आहे.

## सारंगवाडी प्रकल्पातील अनियमिततेची एसआयटीमार्फत चौकशी



**नागपूर :** बुलढाणा जिल्ह्यातील सारंगवाडी जलसंधारण प्रकल्पाच्या खर्चवाढीबाबत आणि संभाव्य अनियमिततेबाबत विशेष तपास पथक (एसआयटी) नेमून तीन महिन्यांत चौकशी केली जाईल तसेच दोषी आढळणाऱ्यांवर निलंबनासह कठोर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य श्वेता महाले यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना मंत्री राठोड म्हणाले की, सारंगवाडी हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असून २००९ मध्ये जलसंपदा विभागाने त्याला तांत्रिक मंजुरी, मूळ प्रशासकीय मान्यता आणि वर्क ऑर्डर दिली होती. मात्र, प्रत्यक्ष काम सुरू झाले नव्हते. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सातत्यपूर्ण मागणीनंतर हा प्रकल्प जलसंधारण विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला. प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान भूपात्रात तफावत, क्रॉस सेक्शन व सांडव्याच्या लेव्हलविषयक अडचणी, डिझाईन बदल, उच्च स्तर कालव्याच्या डिझाईनमुळे टेल चॅनलशी संबंधित समस्या आदी कारणांमुळे खर्च वाढला आहे. या अडचणी दूर करण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यताही देण्यात आल्या आहेत. मंत्री राठोड म्हणाले की, 2017 पासून लागू झालेल्या जीएसटीमुळे सुमारे 28 कोटी रुपयांची वाढ झाली आहे. भूसंपादनासाठी सुमारे 25 कोटी रुपये खर्च झाले.

## पान १ वरून...

### अधिवेशनाचे सूप वाजले..

एक जुलैपर्यंत कर्जमाफीची योजना काय असेल? याबाबत आम्ही घोषणा करू, असे त्यांनी म्हटले. शेतकऱ्यांच्या संदर्भात आलेल्या विषयावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांसाठी ३२ हजार कोटींचे पॅकेज घोषित केले होते. या पॅकेजमध्ये १० हजार कोटी इन्फ्रास्ट्रक्चर होते. २ हजार कोटी नरेगातून देणार होतो. बाकी सगळी थेट मदत होती. या पॅकेजमध्ये ३ हेक्टरची मर्यादा ठेवली होती. या मर्यादेत एनडीआरएफचे पैसे दिल्यानंतरही आपण रब्बीच्या हंगामासाठी हेक्टरी १० हजार रुपये अतिरिक्त देण्याचा निर्णय केला होता. यासंदर्भात पशुपालकांना पशुधन हानीसाठी पैसे देण्याचे कबुल केले होते. त्याचे सगळे पैसे दिलेले आहेत. नरेगाच्या अंतर्गतचे काम सुरू आहे. अतिवृष्टीमुळे बुजलेल्या सिंचन विहिरींच्या कामासाठी ३० हजारांच्या मर्यादेपर्यंत पैसे द्यायचे होते, २७ हजार विहिरींच्या दुरुस्तीसाठी ८० कोटी रुपये उपलब्ध करून दिलेले आहेत.

**सत्र कालावधीतील कामकाजाची संख्यांकिय माहिती**

एकूण बैठकींची संख्या - ७
प्रत्यक्ष झालेले कामकाज - ७२ तास ३५ मिनिटे
अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ - १० मिनिटे
रोजचे सरासरी कामकाज - १० तास २२ मिनिटे
शोक प्रस्ताव - १२
तारांकित प्रश्न
प्राप्त प्रश्न - ७ हजार २८६
स्वीकृत प्रश्न - २१५
उत्तरीत झालेले प्रश्न - २७
अधार्तास चर्चा
**तारांकित प्रश्नाच्या उत्तरातून उद्भवलेल्या प्राप्त सूचना - २३**
स्वीकृत - १९
चर्चा झाली - २
सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा
प्राप्त सूचना - १६०
मान्य सूचना - ६९
चर्चा झाली - ३
**सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेले अध्यादेश - ६**
**अध्यादेश नापसंती व्यक्त करण्यात आलेले प्रस्ताव संख्या - ६**
शासकीय विधेयके
विधानसभा पुनःस्थापित - १८
संमत - १६
विधान परिषद संमत - ४
अशासकीय विधेयके
प्राप्त सूचना - २१
मान्य - ८
पुनः स्थापित - ८

### नागपूर अधिवेशन वांझोटे...

अधिवेशनाच्या समारोपानंतर पत्रकारांशी बोलताना भास्कर जाधव यांनी शेतकरी कर्जमाफीवरून सरकारला धारेवर धरले. ते म्हणाले, "अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होती, पण सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. काल-परवापर्यंत सरकार ३० जूनला कर्जमाफी करणार, असे सांगत होते. मात्र, आज मुख्यमंत्र्यांनी भाषणात '१ जुलैला निकष आणि धोरण सांगू', असे म्हटले आहे. याचाच अर्थ सध्या तरी कर्जमाफीचा कोणताही पत्ता नाही." लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचे नाव सुद्धा घेतले नाही. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थींच्या मुद्द्याच्याबाबत एक शब्दही काढला नाही. त्याचबरोबर अनेक विषय आहेत, ज्याबद्दल सरकारने एक शब्दही काढला नाही. त्यामुळे आजचे अधिवेशन वैदर्भीय जनतेला फसवणे, भावनांशी खेळणे, विदर्भातील जनतेला गृहीत धरणे, अशा अर्थानेच हे अधिवेशन पार पडले. परंतु त्या सहकार्याच्या माध्यमातून पदरात काहीच पडले नाही, अशी टीका ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी केली.

# मुंबईची तिजोरी लुटणारे 'रहमान डकैत'

## एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**

"आम्ही मुंबईचे रस्ते धुतले, पण तिजोरी कधीही धुतली नाही. मात्र, काहींनी कोविड असो वा मिठी नदीचे काम, प्रत्येक ठिकाणी डल्ला मारला. ते मुंबईच्या तिजोरीवर दरोडा टाकणारे 'रहमान डकैत' आहेत, तर अशा डकैतांना पाणी पाजणारे आम्ही 'धुरंधर' आहोत," अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाव न घेता उद्धव ठाकरेंवर टीका केली. हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना शिंदे यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेतला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेमध्ये बोलताना, "इलाका किसी का भी हो, धमाका महायुती करेगा. हमारी सारी योजना हैं गेम चेंजर, कॉर्पोरेशन का इलेक्शन जित कर हम ही होंगे धुरंधर." या शायरीतून टोलेबाजी केली.

विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना शिंदे म्हणाले, "माझे नाव घेतल्याशिवाय काहींचा दिवस उगवत नाही आणि मावळतही नाही. मी मुख्यमंत्री होतो तेव्हाही आणि आता उपमुख्यमंत्री असतानाही मला घटनाबाह्य म्हटले जाते. पण मी टीकेला टीकेने नाही, तर कामाने उत्तर देतो. लोक मला म्हणतात, याचा अर्थ 'डेडिकेटेड टू कॉमन मॅन' असा आहे. सर्वसामान्य घरातील व्यक्ती पदावर बसल्याने काहींना जळजळ होत आहे."

मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव असल्याचा आरोप विरोधकांकडून नेहमी केला जातो. त्यावर बोलताना शिंदे यांनी स्पष्ट केले की,





"सूर्य-चंद्र आले किंवा कुणाच्या सात पिढ्या खाली आल्या तरी मुंबईला महाराष्ट्रापासून कुणीही तोडू शकत नाही. उलट मुंबईबाहेर गेलेल्या मराठी माणसाला पुन्हा मुंबईत आणण्याचे काम आम्ही करत आहोत."

"मुंबईकरांसाठी बाळासाहेब ठाकरेंच्या जन्मशताब्दी दिनी 23 जानेवारी निमित्त योजना पुष्प अर्पण करणार आहोत. विधिमंडळाच्या मध्यवर्ती सभागृहात बाळासाहेबांचे तैलचित्र आम्ही लावले. मी मुख्यमंत्री झाल्यावर आयुक्तांना बोलवून निर्णय घेतला आणि आपण 300 एकरचे सेंट्रल पार्क आज करतोय. पंतप्रधान मोदींच्या जन्मदिनी आम्ही राज्यातील सर्व शहरांतील गार्डनसाठी पैसे दिले," असेही एकनाथ शिंदे म्हणाले. यावेळी त्यांनी मुंबईतील कोस्टल रोड, पॉड टॅक्सी आणि ३०० एकरांच्या सेंट्रल पार्कसारख्या प्रकल्पांची माहिती दिली.

शेतकरी कर्जमाफी आणि लाडकी बहीण योजनेवरून शिंदे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. "राज्य सरकारने अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना 15 हजार कोटींची मदत दिली. निकष, नियम बदलून शेतकऱ्यांना मदत केली. त्यावर आता काहीजण कर्जमाफीचं विचारलं जातंय. शेतकऱ्यांची कर्जमाफी होणारच, हा आमचा शब्द आहे. आम्ही सत्तेत येण्यापूर्वी दिलेला शब्द पाळतो, त्याला 'प्रिंटिंग मिस्टेक' म्हणत नाही," असा टोला त्यांनी विरोधकांना लगावला. तसेच, "लाडकी बहीण योजना बंद पडेल, अशी आवई उठवली जात होती. पण अजूनही सुरू आहे. जे कोर्टात गेले ते, हरले. पण कोणीही 'माई का लाल' आला तरी लाडक्या बहिणीची ओवाळणी बंद होणार नाही. त्यांना २१०० रुपये देणार म्हटले तर देणारच," अशी ठाम ग्वाही एकनाथ शिंदे यांनी सभागृहात दिली.

## तुमच्या प्रचारासाठी राबले हक्कासाठी लढले तर बदडले?

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणली होती. या प्रशिक्षणार्थींना रोजगार देण्याचे आश्वासन तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी दिले होते आता त्या तरुणांना रस्त्यावर सोडले आहे. काल आंदोलन केले तर त्यांना बदडून काढण्यात आले ही कसली व्यवस्था असा आक्रमक सवाल काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवर यांनी उपस्थित केला.

विधानसभेच्या लक्षवेधी प्रश्नात वडेट्टीवार म्हणाले, निवडणुकी आधी ही योजना आणली ,आता ती योजना बंद करून टाकली. या मुलांनी सरकारसाठी प्रचार केला, तुमच्यासाठी निवडणुकीत ते राबले त्याचे बक्षीस काय दिले तर काल आंदोलन केले म्हणून बेदम मारहाण केली,यातील मुलांना फ्रॅक्चर झाले आहेत, इतकी असंवेदनशील वृत्ती सरकारची आहे. या मुलांच्या भविष्याचे काय? तत्कालीन मुख्यमंत्री म्हणाले होते त्यांना आम्ही सेवेत कायम करू त्याच काय झालं असा आक्रमक पवित्रा वडेट्टीवार यांनी विधानसभेत घेतला.

यावर उत्तर देताना मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी या प्रशिक्षणार्थींना आम्ही नवीन योजनेत सामावून घेऊ आम्ही याबाबत नवीन धोरण करणार आहोत असे आश्वासन सभागृहात दिले.



विधानसभेत प्रश्नोत्तराच्या काळात विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील भाकड जनावरांबाबत प्रश्न उपस्थित केले. गोवंश हत्याबंदी कायदा आहे. जेव्हा शेतकरी जनावरांची वाहतूक करतात तेव्हा त्यांना थांबवले जाते, धमकी दिली जाते ऐकले नाही तर मारहाण केली जाते. एका १७ वर्षाच्या शेतकऱ्याला इतकी मारहाण केली की त्याने आत्महत्या केली. भाकड जनावर विकून शेतकऱ्यांना काही पैसे तरी मिळतात. पण आता या बोगस टोळ्या शेतकऱ्यांच्या गाड्या थांबवून त्यांच्याकडून पैसे वसुली करतात याविरोधात सरकारने कारवाई केली पाहिजे,ही वसुली थांबवली पाहिजे. वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की भाकड जनावर प्रकरणी ज्या टोळ्या गैरफायदा घेतात त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. शेतकरी जनावरांची वाहतूक करताना अडवणूक झाली तर अशा लोकांवर कारवाई करण्यात येईल कुणाला पाठीशी घालण्यात येणार नाही.

## हिवाळी अधिवेशन महापालिका निवडणुकांसाठीच होते : भास्कर जाधव

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**

"नागपूर कराराप्रमाणे विदर्भाला न्याय मिळण्यासाठी हे हिवाळी अधिवेशन व्हायला हवे होते. मात्र, विदर्भाच्या पदरात काहीच पडले नाही. हे अधिवेशन कोणालाही न्याय देण्यासाठी नसून केवळ पुरवणी मागण्या मंजूर करून सरकारी पैशांची उधळपट्टी करण्यासाठी आणि त्यातून आगामी निवडणुकांसाठी मते विकत घेण्यासाठीच होते," अशा शब्दांत ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी राज्य सरकारवर सडकून टीका केली.

आज नागपुरात सुरू असलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. अधिवेशनाच्या समारोपाच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा होणार असून, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरोधकांनी केलेल्या आरोपांना आणि उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे देणार आहेत. तत्पूर्वी भास्कर जाधव यांनी सरकारच्या कामकाजाचे वाभाडे काढले.

अधिवेशनाच्या सांगतेच्या वेळी बोलताना जाधव म्हणाले, "विदर्भ वेगळा होऊ नये म्हणून झालेल्या करारानुसार वर्षातून एक अधिवेशन नागपूरला होते. या अधिवेशनात विदर्भाच्या प्रश्नांना प्राधान्य देणे अपेक्षित असते. मात्र, सभागृहात ज्या घोषणा झाल्या, त्या केवळ मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नागपूरसारख्या मोठ्या महानगरपालिकांत मते मिळवण्यासाठीच



होत्या. बिल्डरांच्या फायद्याचे निर्णय घेण्यात आले, पण विदर्भातील सामान्य माणसाला काय मिळाले?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना जाधव म्हणाले, "कालच सभागृहात एमपीडीए कायद्याचे १०८ क्रमांकाचे विधेयक अचानक आणले गेले. त्यात अनेक घातक तरतुदी असतानाही कोणतीही चर्चा न करता ते मंजूर करण्यात आले. हे अधिवेशन केवळ आगामी निवडणुका जिंकण्यासाठी आणि लोकांना पैसे वाटण्यासाठीच घेतले गेले, हे माझे म्हणणे आता खरे ठरले आहे."

लक्षवेधींना वेळच्यावेळी उत्तरे मिळाली नाही, तर राज्याच्या मुख्य सचिवांवर हक्कभंग आणावा असे अध्यक्ष महोदय म्हणाले. २०२२ पासून आपल्या विधानभवनाचे नाव लक्षवेधी भवन ठेवा, असे मी म्हणालो होतो.

## गोवंश संवर्धन आणि भाकड जनावरांच्या पालनाबाबत शासनाची भूमिका संवेदनशील : पंकजा मुंडे

**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १४ :**

गोवंश संवर्धन आणि भाकड जनावरांच्या पालनाबाबत शासनाची भूमिका अत्यंत संवेदनशील आहे. गोवंश वाचवायचा असेल तर भाकड जनावरांचे संगोपन महत्त्वाचे आहे. त्यामुळे गोरक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान देणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असून, या बाबतीत राज्य देशात पहिल्या क्रमांकावर असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

विधानसभा सदस्य विजय वडेट्टीवार, विक्रम पाचपुते, शेखर निकम, डॉ.संजय कुटे यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नांवर उत्तर देताना मंत्री मुंडे यांनी सांगितले की, हे प्रश्न नसून सकारात्मक सूचना आहेत आणि त्यावर सरकार आधीपासूनच कार्यवाही करत



आहे. भाकड जनावरांच्या पालनासाठी चारा विकास तसेच पावसाच्या अंदाजानुसार चारा व्यवस्थापन आदी उपक्रम हे शासनाच्या नियमित कार्यपद्धतीचा भाग असल्याचे त्यांनी सांगितले.

गोवंश केवळ दूधापुरताच उपयुक्त नसून, शेण व गोमूत्राचाही शेतीसाठी मोठा सकारात्मक उपयोग होत असल्याचे मंत्री मुंडे म्हणाल्या. गोवंश संरक्षणाचा निर्णय घेतल्यानंतर त्यातून माघार घेण्याचा प्रश्नच येत नाही. उलट भविष्यात ही योजना अधिक सक्षम कशी करता येईल, यासाठी शासन प्रयत्नशील राहील, असे त्यांनी सांगितले.

मात्र या कायद्याचा गैरफायदा घेणाऱ्यांबाबत शासन अतिशय संवेदनशील असून, अशा घटकांवर कठोर कारवाई केली जाईल. शेतकरी स्वतः जनावरांची वाहतूक करत असताना त्यांची अडवणूक झाली, तर अशा प्रकरणात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील, असेही त्यांनी सांगितले. गोशाळांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाबाबत नियमित लेखापरीक्षण (ऑडिट) केले जाईल. भविष्यात बायोमेट्रिक प्रणालीद्वारे जनावरांची नोंदणी करण्याबाबतही विचार सुरू असल्याचे मंत्री मुंडे यांनी सांगितले.

## राज्यातील शिक्षकांना बीएलओच्या कामातून मुक्त करण्याच्या हालचाली

**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १४ :**



राज्यातील शिक्षकांवर सोपवण्यात येणाऱ्या अशैक्षणिक कामांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होणाऱ्या परिणामाची गंभीर दखल राज्य सरकारने घेतली आहे. शिक्षकांना मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यासारख्या अशैक्षणिक कामांतून मुक्त करण्यासाठी आता खुद्द राज्याच्या मुख्य सचिवांच्या स्तरावरून संबंधित विभागांना निर्देश दिले जाणार आहेत, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधान परिषदेत एका तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली.

विधान परिषदेचे सदस्य विक्रम काळे, सतीश चव्हाण, सुधाकर अडबाले, अभिजित वंजारी, भाई जगताप यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. ऑक्टोबर २०२५ च्या सुमारास खासगी अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांना निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अधिग्रहित केले जात आहे. एकाच शिक्षकाकडे अनेक वर्गांची जबाबदारी असताना त्यांना मतदार नोंदणीसारख्या महसुली कामांना जुंपल्याने आरटीई कायद्याचे उल्लंघन होत असल्याचा मुद्दा आमदारांनी लावून धरला होता. तसेच इतर मुद्देही लावून धरले होते.

## मुरूम उत्खननाबाबत ग्रामपंचायतचा निर्णय अंतिम : चंद्रशेखर बावनकुळे

**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १४ :**



गावकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत सांगली जिल्ह्यातील मौजे भडकंबे येथील खडी व मुरूम उत्खननाबाबतचा अंतिम निर्णय ग्रामपंचायतीचाच असेल, अशी भूमिका महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सभागृहात मांडली. विधानसभा सदस्य जयंत पाटील यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री बावनकुळे बोलत होते. पुढील सात दिवसांच्या आत संबंधित सर्व यंत्रणांची संयुक्त बैठक व प्रत्यक्ष स्थळ पाहणी (स्पॉट इन्स्पेक्शन) घेण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. या बैठकीसाठी पंचायत समितीचे उपअभियंता, वैद्यकीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, भूजल सर्वेक्षण विभागाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक, तहसीलदार, प्रांत अधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी (डीएमओ), पर्यावरण विभागाचे उपप्रादेशिक अधिकारी तसेच इतर महसूल अधिकारी उपस्थित राहणार आहेत. यासोबतच संबंधित ग्रामपंचायतींचे सर्व पदाधिकारी व सदस्यही सहभागी होतील, असे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले. स्पॉट पाहणीदरम्यान ग्रामपंचायतीने उपस्थित केलेले सर्व प्रश्न, शंका व गावकऱ्यांना होणारा त्रास याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येईल. ग्रामपंचायत व गावकऱ्यांचे म्हणणे पूर्णपणे ऐकून घेतले जाईल. जर यानंतरही ग्रामपंचायत किंवा गावकऱ्यांचे समाधान झाले नाही, तर स्वतः हस्तक्षेप करून संबंधित प्रकल्प सुरू ठेवायचा की बंद करायचा, याचा निर्णय घेण्यात येईल, असे महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले. ग्रामसभेला आणि गावकऱ्यांच्या मताला सर्वोच्च महत्त्व आहे. ग्रामपंचायतीने परवानगी दिली तरच काम सुरू राहील, अन्यथा ते बंद करण्यात येईल. ग्रामसभेने घालून दिलेल्या अटींचे पालन झाले तरच उत्खनन सुरू राहील, अन्यथा ते तत्काळ बंद करण्यात येईल.

## बिबट्याच्या हल्ल्यात चार वर्षांच्या मुलाचा मृत्यू

**■ महासागर प्रतिनिधी अहमदनगर, दि. १४ :**

महाराष्ट्रातील अहमदनगरमध्ये एका नरभक्षक बिबट्याची दहशत सुरूच आहे. संगमनेर तहसीलमध्ये बिबट्याच्या हल्ल्यात एका चार वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी संध्याकाळी घडली. त्याची आजी बाहेर काम करत असताना चार वर्षांचा मुलगा त्याच्या घराच्या दाराशी उभा होता. एक बिबट्या आला आणि त्याला घेऊन गेला. मुलाच्या मृत्यूमुळे ग्रामस्थ प्रचंड संतापले आहेत आणि त्यांनी बिबट्याशी एन्काउंटर करण्याची मागणी केली आहे.

दोन दिवसांपूर्वी, बिबट्याला पकडण्यासाठी अहमदनगरमध्ये २०० पिंजरे आणण्यात आले होते. दरम्यान, मुलाच्या कुटुंबाने मृतदेह स्वीकारण्यास नकार दिला. तथापि, प्रशासनाने नरभक्षक बिबट्याला मारण्याचे आदेश दिल्यानंतर त्यांनी मृतदेह स्वीकारला. मृत बालक सिद्धेश कडलगवर रविवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. शिरपूर तालुक्यातील भरवडे परिसरात कोरड्या विहिरीत पडलेल्या बिबट्याला सुरक्षितपणे वाचवण्यात वन विभागाला मोठे यश मिळाले आहे.

# कौशल्य विकास व प्रशिक्षण योजनांची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**

राज्यातील बेरोजगार युवकांसाठी सुरू असलेल्या कौशल्य विकास व प्रशिक्षण योजना अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू राहील, अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य राहुल पाटील यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सुचनेला उत्तर देताना मंत्री लोढा बोलत होते. मंत्री लोढा यांनी सांगितले की, 2007 नंतर बेरोजगारांसाठी कोणतीही ठोस योजना नव्हती. सध्याची योजना ही रोजगारासाठी नव्हे, तर प्रशिक्षणासाठी सुरू करण्यात आली होती. सुरुवातीला सहा महिन्यांसाठी असलेली योजना निवडणुकीनंतर बंद न करता पाच महिने वाढविण्यात आली. याशिवाय पुरवणी मागण्यांमध्ये या योजनेसाठी 400 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, अर्थसंकल्पातही 418 कोटी रुपयांची तरतूद



करण्यात आली आहे. त्यामुळे ही योजना बंद होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

राज्यातील आयटीआय संस्थांमध्ये नवीन, रोजगाराभिमुख व लोकप्रिय अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहे. अल्पकालीन (शॉर्ट टर्म) अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमांचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले असून, पहिल्याच टप्प्यात ५५ हजार विद्यार्थ्यांनी लाभ घेतला असल्याची माहिती मंत्री लोढा यांनी दिली.

तसेच मुख्यमंत्री स्वरोजगार योजना सुरू करण्यात आली असून, पहिल्या वर्षात ५ लाख बेरोजगारांना लाभ देण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत दरवर्षी ५ लाख विद्यार्थ्यांना ३ टक्के व्याजदराने ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाणार आहे. केवळ कर्जपुरवठाच नव्हे, तर प्रत्येक आयटीआयमध्ये इन्क्युबेशन सेंटर, मेंटरशिप ग्रुप उभारले जाणार असून, ऑनलाईन प्रश्न-उत्तरासाठी स्वतंत्र ॲपही तयार करण्यात आले असल्याची माहितीही मंत्री लोढा यांनी दिली. दरम्यान, प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी १ जानेवारीपासून विशेष नवीन योजना अमलात आणली जाईल, असेही मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले. या लक्षवेधीत सदस्य जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, योगेश सागर यांनीही सहभाग घेतला.

## एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होणार असतील तर आनंदच : अब्दुल सत्तार

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**



प्रकाश आंबेडकर हे जे बोलले आहेत ती काळाची गरज आहे. माझा नेता मुख्यमंत्री होणार असेल तर त्यांच्या तोंडात मी पेढा टाकायला हवा. त्यांचे आभार मानायला हवे. शेवटी ते ज्येष्ठ नेते आहेत. प्रकाश आंबेडकर यांना काही तरी समजत असेल म्हणून ते बोलत आहेत. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी एकनाथ शिंदे पुन्हा एकदा मुख्यमंत्री होतील असे म्हटले यावर बोलताना बोलताना शिवसेनेचे माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी असे म्हटले आहे.

अब्दुल सत्तार म्हणाले की, पृथ्वीराज चव्हाण यांनी मराठी माणूस पंतप्रधान होईल असे म्हटले आहे. महाराष्ट्रातील कोणताही पुढारी जर पंतप्रधान झाला तरी आम्हाला त्याचा आनंद होईल. पृथ्वीराज चव्हाण बोलले म्हणजे त्यांना काही तरी माहिती असेल म्हणूनच ते बोलले असतील. सध्या जर बघितले तर देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आणि भाजपचे वरीष्ठ नेता म्हणून चांगले काम करत आहे. ते देशाचे पंतप्रधान होऊ शकतात.

अब्दुल सत्तार म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांची खूर्ची रिकामी झाली तर त्यांच्या जागी मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांची निवड होऊ शकते. पण पृथ्वीराज चव्हाण यांनी केलेल्या विधानात किती सत्यता आहे हे पाहावे लागेल. ज्या वेळेस घडायचे ते दिल्लीमधून घडते. दिल्लीत काय घडते हे माज्यापेक्षा जास्त पृथ्वीराज चव्हाण यांना चांगल्या पद्धतीने माहिती असते. ते जे बोलले त्यात किती सत्य आहे हे आपण 19 तारखेला पाहून घेऊ.

## गुटखा तस्करी; दोघांना अटक

**अकोला :** प्रतिबंधित गुटखा तंबाखूची तस्करी करणाऱ्या दोघांना अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी एकूण ६० हजार ९३० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला आहे. डाबकी रोड परिसरातील आशिष हरिश्चंद्र वासेकर हा प्रतिबंधित पानमसालाव सुगंधित तंबाखूने भरलेले बोरे घेऊन जात असताना पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. शिवनी येथील रहिवासी विजयशर्मा चंद्रदीप याच्याकडूनही प्रतिबंधित सुगंधित तंबाखू जप्त करण्यात आला आहे.

## अकोल्यात २०, २१ डिसेंबरला पुष्प प्रदर्शनी

■अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :

मागील पन्नास वर्षापासून सातत्याने होत असलेली पुष्प प्रदर्शनी यंदा २० व २१ डिसेंबर रोजी स्थानिक शुभ मंगल कार्यालय, गोरक्षण रोड येथे आयोजित करण्यात आली आहे. अकोला गार्डन क्लब च्या वतीने मागील ५१ वर्षापासून ही प्रदर्शनी नियमित भरवली जाते. यंदा पुष्पप्रदर्शनीचे ५२ वे वर्ष असून, विविध प्रकारचे फुल, शोभिवंत झाड, कॅक्टस प्लांट, बोन्साय, सह इतरही आकर्षक फुल व झाड प्रदर्शनात अकोलेकरांना बघायला मिळणार आहेत.अकोला गार्डन क्लब ही संस्था आता एक सामाजिक चळवळ झाली असून, वर्षाच्या शेवटी गार्डन क्लबचा फ्लावर शो जरी असला, तरी वर्षभर वृक्ष संगोपन, वृक्षारोपणसह, शहराला हरित करण्याकरिता विविध कार्यक्रमांचा आयोजन नियमित सुरू असतं. विविध प्रकारच्या कार्यशाळा व त्या माध्यमातून अकोलेकरांना मार्गदर्शन व टेरेस गार्डन, हाऊस गार्डन, किचन गार्डन, करिता प्रेरित करण्याचं काम अकोला गार्डन क्लब मागील अनेक वर्षापासून करत आली आहे.

अकोला गार्डन क्लब ने अगदी छोट्या प्रम ाणात सुरू केलेली ही संस्था आज प्रचंड मोठी झाली असून, दोन दिवसात २५ हजार पेक्षा जास्त अकोलेकर गार्डन क्लबच्या पुष्प प्रदर्शनीला दरवर्षी



भेट देत असतात. शेकडो फुल, आकर्षक झाडं व विविध प्रकारचे गार्डन्स इथे बघायला मिळणार असून, अकोलेकरांना सरत्या वर्षाच्या शेवटी ही संधी गार्डन क्लब ने उपलब्ध करून दिली आहे. आयोजकांनी या पुष्पप्रदर्शनीला भेट देण्याचं आवाहन अकोलेकरांना केला आहे. ही प्रदर्शनी सकाळी दहा ते रात्री आठ पर्यंत दोन्ही दिवस सुरू असणार आहे.

## राष्ट्रीय लोकन्यायालयात ८ हजार ६४३ प्रकरणे निघाली निकाली

### कौटुंबिक न्यायालय १२ प्रकरणांमधील जोडप्याचे जुळून आले संसार

■अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांचे निर्देशानुसार १३ डिसेंबर रोजी अकोला जिल्हयातील सर्व दिवाणी व फौजदारी न्यायालये तसेच कामगार न्यायालय, सहकार न्यायालय, कौटुंबीक न्यायालय, औद्योगिक न्यायालय व जिल्हा ग्राहक तकार आयोग, अकोला येथे राष्ट्रीय लोक अदालतचे आयोजन करण्यात आले होते.

अकोला जिल्हयातील सर्व न्यायालयात प्रलंबित प्रकरणापैकी १२ हजार ५२९ प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतमध्ये तडजोडीकरीता ठेवण्यात आली होती. त्यापैकी एकुण १ हजार ७३६ प्रलंबित प्रकरणात व एकुण ६ हजार ९०७ दाखलपुर्व प्रकरणात समेट घडुन आला. ८ हजार ६४३ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामध्ये मुख्यत्वे दिवाणी, फौजदारी, वैवाहीक वाद स्वरूपाची तसेच मोटार वाहन अपघात प्रकरण व कलम १३८ एन. आय. ॲक्ट आणि ग्रामपंचायतचे घरपट्टी/पाणीपट्टी तसेच महावितरण व बँकांची खटलापूर्व प्रकरणात तडजोड होउन रक्कम २६ कोटी ५६ लाख ८६ हजार ४६८ रुपयांची तडजोड झाली. आपसी सहमतीने घटस्फोट घेणारे पती-पत्नी बे एकुण १२ जोडपे नांदण्याकरिता गेले. महत्वाची बाब म्हणजे एका प्रकरणामध्ये पती पत्नी मध्ये असलेल्या वादाबाबत मागील ५० वर्षांपासून प्रकरणे प्रलंबित होती



प्रकरणे लोकन्यायालयाच्या माध्यमातून निकाली निघाली. लोक न्यायालय यशस्वी होणेकरीता एस. बी. कचरे अध्यक्ष,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अकोला यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच जिल्हयात कार्यरत सर्व न्यायाधिश, न्यायालयीन कर्मचारी, वकील वृंद यांचे योगदान लाभले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे यु. आर. वाडेगावकर, अधिक्षक, पी.एम. बलिंगे, सहा, अधिक्षक संजय व्ही. रामटेके, व.लि.पी. एल. भगेवार, कार्यालयीन सहायक वैभव ग.ताथोड, क.लि.व हरिष इंगळे, शिपाई, शाहबाज खान, शिपाई व इतर विधी सेवा प्राधिकरणाचे लिपीक आणि शिपाई लोकअभिरक्षक कार्यालयातील विधीज्ञ आणि न्यायीक कर्मचारी, विधी स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

लोक अदालत यशस्वी पार पाडणेकरिता अकोला बार असोसिएशनपोलिस अधिक्षक कार्यालय,जिल्हाधिकारी कार्यालय,जिल्हा परिषद कार्यालय,अकोला विधी महाविदयालय व नथमल गोयनका विधी महाविदयालय, यांचे सहकार्य लाभले. अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव आर. एन. बन्सल यांनी दिली.

## मुलं शाळांमध्ये किती सुरक्षित ?

अकोला : बदलापूर येथील शाळेतील दुर्दैवी घटनेनंतर शिक्षण विभागाने शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, असा आदेश देण्यात आला आहे. आता या सुरक्षा उपाययोजनांची प्रत्यक्ष तपासणी शाळांमध्ये सुरू झाली आहे. तपासणीचा कार्यक्रम १ ते १८ डिसेंबरदरम्यान राबविला जात आहे.

## टिप्पर व परिवहन बसची जबर धडक



■पातूर,दि १४ (प्रतिनिधी) :

पातूर पासून अंदाजे तिन कि. मि. दूर असलेल्या वाशीम महामार्ग वरील बोडखा या गावात टिप्पर व परिवहन मंडळ च्या बस चा अपघातात २ महिला जखमी झाल्या चि घटना आज दि. १४ डिसेंबर च्या दुपारी ४ वाजता चे दरम्यान घडली याबाबत सविस्तर वृत्त असे कि बोडखा येथिल गिट्टी खदान येथून टिप्पर क्रमांक चक ३० इऊ २६८२ हा मुरूम घेऊन जात असतांना पातूर कडून वाशीम कडे जात असलेली परिवहन महामंडळ बस क्रमांक चक १३उण ७१३५ ने मागून जबरदस्त धडक दिली यात बस मधील चंद्रप्रभा सुरेंद्र मनमोडे वय ७० रा. वाशीम, व वर्षा शैलेश अत्तरकर ह्या दोन महिला जखमी झाल्या घटने चि माहिती मिळताच बोडखा येथिल युवकांनी तात्काळ जखमी यांना उपचारासाठी पातूर येथे रवाना करून तात्काळ पातूर पोलिसांना सूचना दिली असता घटनास्थळी सहा. ठाणेदार बंडू मेश्राम पोलीस कर्मचारी. सत्यजित ठाकूर, वाहतूक कर्मचारी म्हात्रे आदी. नि घटनास्थळ गाठून पंचनामा करीत वाहतूक सुरळीत केली असून वृत्त लिहिस्टोवर पातूर पोलिसांत घटनेची नोंद करण्यात आली नव्हती

## थोडक्यात

### विद्यार्थिनीचा विनयभंग करणाऱ्याविरूध्द गुन्हा दाखल

**बाळापूर :** बाळापूर पोलिस : स्टेशन हद्दीतील एका गावातील अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग करून तिला जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या २२ वर्षीय युवकाविरूध्द बाळापूर पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. या संदर्भात अल्पवयीन विद्यार्थिनीचे फिर्यादनुसार सोमेवर गजानन राऊत हा गेली अनेक दिवसांपासून सतत तिचा पाठलाग करीत असून वारंवार तिला त्रास देत होता. ७ डिसेंबर रोजी पीडित विद्यार्थिनी वसतिगृहामधून क्लासला जात असताना आरोपी दुचाकीवरून तिचे जवळ आला व तिचा हात पकडून तिचा विनयभंग केला. तसेच तू माझी सोबत चल अन्यथा तुला जिवाने मारून टाकेल, अशी धमकी दिल्याचे विद्यार्थिनीने फिर्यादमध्ये म्हटले आहे. वरील घटनेनंतर पीडित विद्यार्थिनीचे फिर्यादनुसार बाळापूर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५ व सहकलम ८, १२, पोक्सो अन्वये आरोपी सोमेवर गजानन राऊत याचेविरूध्द गुन्हा नोंदविला. पुढील तपास बाळापूर पोलिस करीत आहेत.

### अकोल्यात वाढला गारठा !

**अकोला :** महाराष्ट्रात मागील काही दिवसांत थंडीचा जोर सातत्याने वाढत आहे. उत्तर भारतातून येणाऱ्या थंड वाऱ्यांचा वेग वाढल्याने अनेक शहरांचे तापमान घटले आहे. विशेषत: विदर्भात गारठ्याची तीव्रता लक्षणीयरीत्या वाढली आहे. नागपूर, गोंदिया, वर्धा, यवतमाळ अशा जिल्ह्यांत किमान तापमान ८ ते १० अंशसेल्सिअसपर्यंत खाली आले आहे. हवामान विभागाने विदर्भासह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. विदर्भात थंडीचा प्रभाव अधिक स्पष्टपणे जाणवत आहे.नागपूरम ध्ये ८.१ अंश सेल्सिअस,गोंदियामध्ये ८ अंशसेल्सिअस तर वर्ध्यात ९.९ अंशसेल्सिअसवर नोंदवलेगेले.

### कुस्ती पंच प्रशिक्षण शिबिरास प्रतिसाद

**अकोला :** कुस्तीच्या पंचांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रकारांच्या आधुनिक व तांत्रिक पैलूंची माहिती व्हावी, ग्रामीण भागात पारंपारिक कुस्तीचा प्रसार व प्रचार व्हावा, ग्रामीण भागातील व प्रामुख्याने विदर्भातील कुस्ती पंचांना मुख्य प्रवाहात आणून त्यांना सुयोग्य व तंत्रशुद्ध प्रशिक्षण प्राप्त व्हावे यासाठी महानगरात दोन दिवशीय कुस्ती पंचांचे प्रशिक्षण शिबिर संपन्न झाले. या कुस्ती पंच प्रशिक्षण शिबिराचाप्रारंभ अकोला कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष चंदूदादा शिरसाट यांच्या अध्यक्षतेत तथा शिबिराचे मुख्य प्रशिक्षक, आंतरराष्ट्रीय पंच प्रा. दिनेश गंध, आंतरराष्ट्रीय कुस्ती कोच डॉ रणवीरसिंग राहाल, धर्मशील काटकर चंद्रपूर, अकोला कुस्तीगीर संघटनेचे सचिव, विदर्भ केसरी युवराज गावंडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

## मनपा अग्निशमन विभागात कंत्राटी भरतीचा निर्णय

■अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :

अकोला महापालिकेच्या अग्निशमन विभागात महत्त्वाची पदे रिक्त असल्याने या विभागाचे प्रशासकीय कामकाज तसेच आपत्कालीन सेवा प्रभावित झाली आहे. शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या विभागाचे कामकाज तातडीने सुरळीत करण्याच्या उद्देशातून मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. प्रशासनाने आता कंत्राटी तत्त्वावर मुख्य अग्निशमन अधिकारी हे महत्त्वाचे पद भरण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे, अग्निशमन विभागातील फायरमनची रिक्त पदे भरण्यासाठीदेखील कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती केली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शहरात आग आणि इतर आपत्कालीन परिस्थितीत तत्पर सेवा देण्यासाठी तीन पाळ्यांमध्ये सुरळीत कामकाज होणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी किमान ४५ फायरमनची आवश्यकता आहे.

मात्र, सध्या विभागात केवळ ३० फायरमन कार्यरत आहेत, तब्बल १५ फायरमनची पदे रिक्त आहेत. याव्यतिरिक्त, सध्या सुमारे १५ वाहनचालक सेवेत असले तरी, पुढील वर्षी म्हणजे जानेवारी २०२६ मध्ये काही फायरमन आणि वाहनचालक सेवानिवृत्त होणार असल्याने रिक्त पदांची संख्या आणखी वाढणार आहे. त्यामुळे, मुख्य अग्निशमन अधिकारी पदासोबतच फायरमनची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

## पोलीस अधीक्षकांच वार्षिक निरीक्षण

**अकोला :** शहर वाहतूक नियंत्रण शाखा, अकोला येथे आज दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी अर्चित चांडक,पोलीस अधीक्षक, अकोला यांनी



सन २०२५ च्या वार्षिक निरीक्षणानिमित्त भेट देऊन वाहतूक शाखेच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी अधिकारी व अंमलदारांना मौल्यवान मार्गदर्शन करत आवश्यक सूचना दिल्या. वार्षिक निरीक्षणाची सुरुवात वाहतूक शाखा प्रभारी पोलीस निरीक्षक मनोज बहुरे यांनी मा. पोलीस अधीक्षक साहेबांना मानवंदना देऊन केली. निरीक्षणादरम्यान वाहतूक अधिकारी व अंमलदारांच्या टर्नआउटची पाहणी करण्यात आली. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या काही अंमलदारांचे कौतुक करून त्यांना प्रशस्ती देण्यात आली, तर कर्तव्यात त्रुटी आढळलेल्या काही अंम लदारांना समज देण्यात आली.

## अकोटमध्ये राष्ट्रीय लोक अदालत यशस्वी

■अकोट,दि १४ (प्रतिनिधी) :

**३६५२ प्रकरणे निकाली १८ कोटीपेक्षा अधिक रकमेची वसुली**

तालुका विधी सेवा समिती, अकोट यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय लोक अदालत मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या लोक अदालतीमध्ये एकूण ३६५२ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून, १८ कोटी १८ लाख ३७ हजार ९० रुपयांची (रु. १८,०१८३७९०/) विक्रमी वसुली झाली. जिल्हा न्यायाधीश- १ बी. एम. पाटील तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, अकोट यांच्या अध्यक्षतेखाली या लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी एकूण चार पॅनल ठेवण्यात आले होते जिल्हा न्यायाधीश - १. बी. एम. पाटील, अकोट, दिवाणी न्यायाधीश एम. एस. काळे अकोट, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, आरिफ हारुन शेख अकोट, २रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तरए, ए. माळीअकोट यांच्या नेतृत्वाखालील पॅनल ने कार्य केले. लोक अदालतीमध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात प्रकरणे, बँकेची प्रकरणे (दाखलपूर्व सह), एम. ए. सी.बी., बीएसएनएल, तसेच ग्रामपंचायतचे घर टॅक्स, पाणीपट्टी व घरकुलाची प्रकरणे ठेवण्यात आली.

## ईव्हीएम असलेल्या स्ट्रॉंग रुमची सुरक्षा वाढवावी!

■बार्शिटाकळी,दि १४ (प्रतिनिधी) :

नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदान प्रक्रिया २ डिसेंबर रोजी पार पाडली. संबंधित निवडणुकीची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी पार पाडणार आहे. त्यामुळे बार्शिटाकळी नगरपंचायतच्या निवडणूक स्ट्रॉग रूमची सुरक्षा तत्काळ वाढविण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन प्रभाग क्रमांक सहाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) उमेदवार मिस्बा अंजुम अब्दुल खलील रा. कसाबपुरा यांनी बार्शिटाकळीचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दिले आहे. यावर उमेदवार व त्यांचे वडील अब्दुल खलील अब्दुल गणी यांचीही स्वाक्षरी आहे. निवेदनामध्ये नमूद केले की, बार्शिटाकळी नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबर रोजी घोषित होणार आहे. सध्या मतदानाच्या ईव्हीएम मशीन नगरपंचायतच्या स्ट्रॉग रूममध्ये सीलबंद आहेत. मात्र अनेक उमेदवार हे दिवसभर नगरपंचायतमध्ये ठिय्या मांडून बसले असतात. तसेच नगरपंचायतचे स्थानिक कर्मचारीसुद्धा स्ट्रॉग रूमचे आजूबाजूला फिरत असतात. त्यामुळे मी आपणास विनंती करतो की स्ट्रॉग रूमचे आतून व बाहेरून मोठ्या प्रमाणात सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात यावी अन्यथा काही झाल्यास संपूर्ण जबाबदारी आपली राहील, असेही निवेदनात म्हटले आहे. या निवेदनाची परत त्यांनी निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य, जिल्हाधिकारी अकोला, जिल्हा पोलीस अधीक्षक यांनाही सादर केले आहे.

## पणज येथे संगीतमय शिव महापुराण कथा सप्ताहास प्रारंभ

**पणज :** अकोट तालुक्यातील पणज येथील श्री संत गाडगे महाराज मंदिरात १३ डिसेंबरपासून अखंड हरिनाम सप्ताह व संगीतमय शिव महापुराण कथा निरूपणास प्रारंभ झाला आहे. श्री संत गाडगे महाराज मंदिर व समस्त गावकरी मंडळी पणज यांच्यातर्फे या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहात सतत ८ दिवस विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. कथावाचक नागेश महाराज आगलावे आळंदी देवाची यांच्या सुश्राव्य वाणीतून भाविकश्रोते कथा श्रवण करीत आहेत.

सप्ताहात दररोज सकाळी काकडा, भजन पूजन, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, हरी कीर्तन तसेच अखंड हरिनाम यासह विविध धार्मिक कार्यक्रम होत आहेत. सप्ताहात केशव महाराज मोरे, दादा महाराज पाटील, श्रद्धा अतुल बोराखडे, अरुण महाराज लांडे, भय्यूजी महाराज भुसावळ, कन्हैया महाराज राजपूत, वाल्मिक महाराज सुरायकर यांचे संध्याकाळी हरीकिर्तन पार पडणार आहे. सप्ताहाच्या समाप्तीदिनी २० डिसेंबर रोजी सकाळी गावातील मुख्य मार्गानि ग्रंथाची मिरवणूक टाळ मृदंगाच्या निनादात व देवकी नंदन गोपालाच्या जयघोषात काढण्यात येणार आहे.

## अकोट तालुक्यातील महिला शिक्षिका यांच्या करिता कायदेविषयक कार्यशाळा

■अकोट,दि १४ (प्रतिनिधी) :


जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अकोला जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय अकोला आणि शिक्षण विभाग अकोला यांचे संयुक्त विद्यमाने बेटी बचाव बेटी पढाव आणि बाल विवाह मुक्त भारत संकल्प अभियान १०० दिवस अंतर्गत अकोट तालुक्यातील जिल्हा परिषद, नगर परिषद च्या शाळा, खाजगी अनुदानित, विनाअनुदानित, स्वयं अर्थ सहायीत शाळा मधील महिला शिक्षिका यांच्या करिता महिला व बालक यांच्या बाबतीत असणारे कायदे यांची माहिती व्हावी या करिता दिनांक १६/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यांचल द स्कूल अकोट येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यशाळेत बालविवाह अधिनियम २००६, बाल लैंगिक अत्याचार अधिनियम २०१२, २०१३, सायबर सुरक्षितता समुपदेशन,महिलांचे कायदे या बाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

तरी तालुक्यातील सर्व महिला शिक्षिका यांनी प्रशिक्षण कार्यशाळे करिता उपस्थित रहावे असा आवाहन श्री मधुकर सूर्यवंशी गटशिक्षणाधिकारी अकोट यांनी केले आहे.

## शिवाजी शिक्षण संस्थेचा क्रीडा महोत्सव प्रेरणास्पद:भट्ट

■अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :

शिवाजी शिक्षण संस्था अमरावती अंतर्गत अकोला व वाशिम जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा हा क्रीडा महोत्सव प्रेरणास्पद असून याने विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना उजाळा मिळून ते क्रीडा क्षेत्रात तरबेज होतात असे भावोद्गार जिल्हा क्रीडा अधिकारी सतिश्चंचद्र भट्ट यांनी काढले. शिवाजी विद्यालय शहर शाखा हरिहरपेठ व आयोजन समिती अकोला प्रभाग क्रीडा महोत्सव समितीच्या वतीने स्थानीय वसंत देसाई क्रीडांगणावर शिक्षण महर्षी तथा शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती निमित्त आयोजित क्रीडा महोत्सवात उद्घाटक म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी सतिशश्चंद्र भट्ट मार्गदर्शन करीत होते.शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष एड. गजाननराव पुंडकर यांच्या अध्यक्षतेत संपन्न या महोत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सदस्य सुरेशदादा खोटरे,संस्थेचे उपाध्यक्ष केशवराव मेंतकर,उपशिक्षणाधिकारी माध्यमि क प्रमोद टेकाडे,अदिती अर्बन सहकारी पतसंस्थाचे बुलढाणाचे अध्यक्ष सुरेश देवकर, शाळा तपासणी अधिकारी प्रकाश अंधारे, आजीवन सभासद बाळकृष्ण मोहोड, प्रा.वाटाणे प्रा.खांडेकर ,विलासराव हरणे



समवेत सर्व शाळांचे मुख्याध्यापक,क्रीडा शिक्षक आदी मान्यवर उपस्थित होते.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमा पूजन व अतिथी स्वागताने या महोत्सवाचा प्रारंभ झाला.


यावेळी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करीत या क्रीडा महोत्सवाची उपयुक्तता प्रतिपादित करीत आपल्या शुभेच्छा प्रदान केल्यात.या महोत्सवात विद्यार्थ्यांच्या विविध मैदानी स्पर्धा संपन्न झाल्यात.सायंकाळी क्रीडा महोत्सवातील अनेक विजेत्या विद्यार्थ्यांना शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रामेश्वर भिसे,अविनाश बोर्डे, मुख्याध्यापक मनोज देशमुख,समवेत विविध मुख्याध्यापक व मान्यवरांचे हस्ते शिल्ड, मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.तसेच उत्कृष्ट खेळाडू व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रकाश अंधारे यांनी करून या वार्षीक क्रीडा महोत्सवाची माहिती दिली.

संचालन श्रीमती अनुराधा मराठे यांनी तर आभार मुख्याध्यापक मनोज देशमुख यांनी मानलेत.यावेळी शिवाजी शिक्षण संस्था अंतर्गत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी व क्रीडा रसिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बोरगाव वैराळे येथे शुक्रवारी सत्यपाल महाराज यांचे जाहीर कीर्तन!

■बाळापुर,दि १४ (प्रतिनिधी) :

बाळापूर तालुक्यातील बोरगाव वैराळे येथे श्री जागेश्वर सेवा समिती, स्वा सैनिक नानासाहेब वैराळे स्मारक समिती व युवा शक्ती मित्र मंडळाच्या संयुक्त विध्यमाने समाज प्रबोधनपर सत्यपाल महाराज यांच्या जाहीर कीर्तनाचा कार्यक्रम श्री जागेश्वर मंदिराच्या प्रागणात दि १९ डिसेंबर २०२५ ला रात्री ८ ते १० यावेळात आयोजित करण्यात आला असून या कीर्तन कार्यक्रमापूर्वी श्री जागेश्वर सेवा समिती व स्वा



सै स्व नानासाहेब स्मारक समितीच्या वतीने बोरगाव वैराळे जि प प्राथमिक शाळेत प्राथमिक शिक्षण घेऊन आता उच्च शिक्षित झालेल्या गावातील काही मुली आणि त्यांचा पालकाचा सन्मानचिन्ह व शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

तरी पंचक्रोशीतील भाविकांनी सत्यपाल महाराज यांच्या प्रबोधनपर किर्तनाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असं आवाहन श्री जागेश्वर सेवा समितीने केले आहे.

### शासनाने राज्यात लोकसेवा आयोग वा विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारी करणाऱ्या

# संस्था/केंद्र तसेच विद्यार्थी संख्याबाबत सांख्यिकीय माहिती ठेवण्यात यावी

## आ. रणधीर सावरकरांनी सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासात केली

**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :** शेवटच्या दिवशी सभागृहाच्या तासात प्रश्नोत्तराच्या तासांमध्ये आमदार रणधीर सावरकर यांनी तारांकित प्रश्न क्रमांक १५९६१ द्वारे प्रश्न उपस्थित केला होता, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) यांच्याकडून देण्यात येणारे विद्यावेतन व थेट प्रशिक्षण पुन्हा सुरु करण्याबाबत प्रश्न उपस्थित केला की, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) यांच्याकडून राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजनेत मासिक विद्यावेतन बंद करून केवळ ऑनलाइन प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे.

हे खरे आहे काय, सदर निर्णयामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील विद्यार्थ्यांना मासिक विद्यावेतन न मिळाल्याने त्यांच्यात नाराजी निर्माण झाली आहे, तसेच महाज्योती संस्थेला शासनाकडून रुपये १५०० कोटी इतका निधी माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय, इतर मागासवर्ग प्रवर्गासाठी प्राप्त निधीतून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि इतर सर्व योजना राबविण्यात येणार असून विद्यावेतन व थेट प्रशिक्षण बंद असलेल्या ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना थेट मार्गदर्शन तसेच आवश्यक भौतिक संसाधने उपलब्ध न टझाल्याने गरीब विद्यार्थ्यांना प्रशिक्षणात नुकसान होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय, असे प्रश्न उपस्थित केले होते.

सदरील तारांकित प्रश्नाचे उत्तरात राज्याचे इतर मागास प्रवर्ग कल्याण मंत्री मा. अतुल सावे यांनी लेखी उत्तरात स्पष्ट केले की, महाज्योती संस्थेमार्फत संघ लोकसेवा आयोग (UPSC), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) राज्यसेवा, संयुक्त गट ब व क तसेच मिलीटरी भरती प्रशिक्षण या स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण ऑफलाईन स्वरूपात देण्यात येते. त्याकरिता विद्यार्थ्यांना विद्यावेतन व आकस्मिक निधी देखील देण्याची योजना नियमित सुरू आहे.

कर्मचारी निवड आयोग (SSC), रेल्वे भरती (RRB) तसेच महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (चएड) या परीक्षांचे स्वरूपच ऑनलाईन परिक्षा पध्दती असल्याने विद्यार्थ्यांनी अनेकवेळा ऑनलाईन प्रशिक्षणाची मागणी महाज्योती कार्यालयास केली होती. त्यानुसार सदर प्रशिक्षण ऑनलाईन पद्धतीने राबविण्याचे प्रस्तावित असून त्याकरिता विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्थेमार्फत टॅबलेट व डेटा देण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी तसेच संतापाची भावना निर्माण होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

# पक्षाचे विरुद्द काम करणाऱ्या मूर्तीजापुरचे ४ जणांना सहा वर्षासाठी भाजपातुन निलंबीत

**▪मुर्तिजापुर,दि १४ (प्रतिनिधी) :** पक्षाच्या विचारांशी गद्दारी करणारे तसेच पक्ष उमेदवारांना पराभूत करण्याचा प्रयत्न करणारे पक्षाच्या विरोधात प्रचार करणारे मुर्तीजापुर येथील कमलाकर गावंडे, भारतीय जनता युवा मोर्चाचे उपाध्यक्ष अमोल पिंपळे सहदोन, जणांना पक्षविरोधी कारवाईच्या पक्ष कारवाई चा पुरावा तसेच उमेदवार हर्षद साबळे तसेच महानगरपालिकेतील उमेदवारांच्या तक्रारीवर जिल्हा भाजपा अध्यक्ष संतोष शिवरकर यांनी सहा वर्षासाठी निलंबित केले आहे व त्यांना पक्षातून सहा वर्षासाठी हकालपट्टी करून त्यांना कोणत्याही संघटनेच्या कार्यक्रमात बोलवण्यात येऊ नये. असे प्रसिद्धी पत्रकात, म्हटले आहे.

भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार विरुद्ध व पक्ष विरोधी कार्यकरणाऱ्या पदाधिकाऱ्यांची पक्षातुन हकालपट्टी करण्यात आली असून पक्ष शिस्त पक्ष विचार पक्ष आचरण पक्षाविषयी आपुलकी पक्षाने दिलेले उमेदवार पक्षाने दिलेले कार्यक्रम यशस्वी करणे हे प्रत्येक पदाधिकाऱ्यांचे कर्तव्य असून या कर्तव्याचा कसूर करणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यात येईल. या दृष्टीने जिल्हा भाजपा अध्यक्ष संतोष शिवरकर यांनी तेलारा अकोट बाळापुर येथील बंडखोराविरुद्ध कारवाई केल्यानंतर आता मूर्तिजापूर येथील चार जणांवर कारवाई केली आहे. या संदर्भातली शिफारस प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे करण्यात आली असून निवडणूक काळात मिळालेल्या अधिकाराचा वापर करून पक्ष संघटनेच्या विचाराशी गद्दारी करणाऱ्या गद्दारांना माफ करण्यात येणार नाही असाही इशारा संतोष शिवरकर यांनी दिला आहे.कोणतीही अपेक्षा न ठेवता तीन पिढी संघर्ष करून पक्ष विस्तार केला आणि त्या पक्षाला नख लावून बदनाम करण्याचा प्रयत्न व संपण्याचा पक्षाच्या विचारांना ,ताजरांजली देणाऱ्यांवर कारवाई केली आहे.

मुर्तीजापुर नगर परिषद निवडणुकी मध्ये भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवारांचे विरुद्ध प्रचार / कट कारस्थान पक्ष विरोधी कार्यवाही करत असलेले भाजपा चे पदाधिकारी. कमलाकर गावंडे - मंडल कार्यकारिणी उपाध्यक्ष अमोल पिंपळे - भा.ज.यु.मो. जिल्हा उपाध्यक्ष, . श्रीकांत रामेकर - भा.ज.यु.मो. मंडल अध्यक्ष,. नितीन भटकर - नमामी गंगे अभियान प्रमुखयांची भारतीय जनता पार्टी मधून ६ वर्षा करिता हकालपट्टी करण्यात आली असून पुढील ६ वर्षा मध्ये यापैकी कोणालाही बैठकीचा निरोप दिल्या जाणार नाही व कोणत्याही निवडणूक प्रक्रियेत संबधित हकालपट्टी केलेल्या व्यक्तींचा काहीही संबंध राहणार नाही. असेही संतोष शिवरकर यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांनी घेतले बाल संरक्षनाचे धडे



**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय अकोला अंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष व मिशन शक्ती सखी वन स्टॉप सेंटर अकोला च्या वतीने बाल विवाह मुक्त भारत १०० दिवस संकल्प अभियान आणि जागतिक महिला हिंसा विरोधी पंधरवाडा अंतर्गत दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी डढ. अपपी एपसश्रळीह ाशवळीा ीलहेश्र अकोला येथे जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला प्रमुख मार्गदर्शक श्रीमती प्रांजली जैसवाल सदस्य बालकल्याण समिती अकोला, ॲड.मनीषा भोरे केंद्र प्रशासक सखी वन स्टॉप सेंटर, जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे सुनिल लाडुलकर आणि सखी वन स्टॉप सेंटर च्या कु.प्रिया इंगळे यांनी सर्व विद्यार्थ्यांना बालकांचे हक्क, अधिकार, सुरक्षित स्पर्श असुरक्षित स्पर्श, चाईल्ड हेल्प लाईन १०९८, बाल विवाह, महिला हेल्प लाइन १८१, महिला बाल विकास च्या योजना या विषयावर माहिती दिली तसेच किशोरवयीन बालिका यांना सुद्धा विशेष मार्गदर्शन सत्र ही घेण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका अनिथा जोसे आणि शाळेचे सर्व शिक्षक शिक्षिका आणि ३०० बालक बालिका उपस्थित होत्या कार्यक्रमाचे सुत्र संचालन शिक्षिका कविता भांडे यांनी केले.

## थोडक्यात

### बाळापूर शहरातील ३ केंद्रावर नवोदयाची प्रवेश पूर्वपरीक्षा

बाळापुर : जवाहर नवोदय विद्यालयाच्या सत्र २०२५ २०२६ करिता व इयत्ता ६ वी च्या प्रवेशासाठी इयत्ता ५ वी मधील विद्यार्थ्यांची प्रवेश पूर्व निवड चाचणीसाठी बाळापूर शहरातील ३ परीक्षा केंद्रावर परीक्षा घेण्यात आली. त्यामध्ये बाळापूर तालुक्यासह अकोला शहरासह बाळापूर शहरातील तीन परीक्षा केंद्रावर ९७५ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ९३१ विद्यांनी हि परीक्षा दिली असून ४४ विद्यार्थी गैरहजर होते. बाळापूर शहरातील तीनही परीक्षा केंद्रावर हि परीक्षा शांततेत पार पडली. बाळापूर शहरातील श्रीमती धनाबाई विद्यालय येथे ३३६ विद्यार्थी पैकी ३२१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर १५ विद्यार्थी गैरहजर होते, अंजुमन उर्दू हायस्कूल येथे ३६० विद्यार्थी पैकी ३४४ विद्याथ्यांनी परीक्षा दिली तर १६ विद्यार्थी गैरहजर होते, तर जि. प. हायस्कूल येथे २७९ विद्यार्थी पैकी २६६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर १३ विद्यार्थी गैरहजर होते. अशा प्रकारे बाळापूर तालुक्यातील बाळापूर शहरात ९७५ विद्यार्थी पैकी ९३१ विद्यार्थ्यांनी नवोदय विद्यालयाची प्रवेश पूर्व परीक्षा दिली असून या तीनही परीक्षा केंद्रावर ४४ विद्यार्थी गैरहजर होते. हि परीक्षा मराठी, हिंदी व इंग्रजी माध्यमातून घेण्यात आली. बायपूर तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी प.सं. बाळापूरचे दिनेश दुतोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बाळापूर शहरातील ३ परीक्षा केंद्रावरनवोदय जवाहर विद्यालयाची प्रवेश पूर्व परीक्षा घेण्यात आली असून बाळापूर शहरातील परीक्षा केंद्रातील श्रीमती धनाबाई विद्यालय येथे प्राचार्य गंगाधर सोळंके, जि.प. हायस्कूल येथे मुख्याध्यापक राजेंद्र थेटे, अंजुमन हायस्कूल येथे साजिद हुसेन यांनी केंद्राध्यक्ष म्हणून काम सांभाळले तर नवोदय विद्यालयाचे विशाल वैभव, नवोदय विद्यालयाचे राजेश सोनटक्के तसेच अंजुमन हायस्कूल येथे सुभाष इंगळे यांनी परीक्षक म्हणून परीक्षेचे काम काज पाहले.बाळापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रकाश झोडगे यांनी तीनही परीक्षा केंद्रावर पोलिसांचा चोख बंदोबस्त लावला होता. तर तालुक्यातील अनेक गावातून आपल्या चिमुकल्या मुलां-मुलींना परीक्षा केंद्रावर सोडण्यासाठी व घेण्यासाठी पालक वर्गही मोठया संख्येने हजर असल्याचे पहावयास मिळाले.

### श्रीराम विद्यालयात पालक सभा संपन्न

**अकोला** : १३/१२/२०२५ ला श्रीराम विद्यालयात वर्ग १ ते १० ची पालक सभा घेण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवाभाऊ मोहोड होते तर प्रमुख पाहुणे अंभोरे सर होते. तसेच प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका अवताडे मॅडम होत्या. तसेच मंचावर सौ. सोनवणे मॅडम, प्रेमा मॅडम, भांबूरकर मॅडम होत्या. यानंतर मंचावर उपस्थित अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या फोटोला हार घालून दीप प्रज्वलन करण्यात आले व मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.त्यानंतर सौ. अवताडे मॅडम यांनी सभेतील विषयांवर चर्चा केली, तसेच विद्यार्थ्यांची सुरक्षितता खूप महत्त्वाची आहे हे सांगितले.तसेच प्रमुख पाहुणे अंभोरे सरांनी त्यांचे विचार व्यक्त केले, त्यामध्ये शाळा व शिक्षकांचे त्यांनी कौतुक केले. तसेच यामध्ये अध्यक्षांनी पालकांना त्यांच्या समस्या व्यक्त करण्यास सांगितले. तसेच प्रत्येक पालकांशी हितगुज करून त्यांनी सांगितलेल्या समस्या यावर त्या समस्यांचे निराकरन करून चर्चा करण्यात आली. सर्व पालकांचे समाधान झाले. या सभेला सर्व पालकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली पालक सभेला सर्व शिक्षक उपस्थित होते. सर्व शिक्षकांचे या कार्यक्रमाला सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. लहामगे मॅडम यांनी केले, तर आभार प्रदर्शन भांबूरकर मॅडम यांनी केले.

### तेल्हारा शहरात भेसळयुक्त दुधामुळे जनआरोग्य धोक्यात येण्याची भीती

**तेल्हारा** : तेल्हारा शहरात दुधात पाण्याबरोबरच इतरही घातक पदार्थ मिसळून भेसळयुक्त दुधाची सर्रास विक्री केली जात असल्यामुळे तेल्हारा शहरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक पातळीवरील पशुपालकांनी पशुखाद्याचे दर वाढल्याने खुल्या दुधाची किंमत ५० रुपये, ६० रुपये व ७० रुपयांपेक्षा जास्त (प्रति लिटर) केली आहे. ग्राहकही दुधाच्या वाढलेल्या किमतीकडे दुर्लक्ष करत महिन्याला ३००/- रुपये जास्त देण्याची तयारी दर्शवत असल्याचे बोलले जात आहे. तर दुसरीकडे घरपोच दूध देणाऱ्या अनेक शेतकऱ्यांकडे दुधाळ जनावरे नसतांनादेखील केवळ पैसा मिळतोय म्हणून पाणी घालून दुधाची विक्री करीत असल्याचे बोलले जात आहे.दुधात जितकी भेसळ तितका दुधाचा रेट कमी असे सरळ गणित असून केवळ पैसा कमावणे याच उद्देशाने काही जण या व्यवसायात गुंतले आहेत. तेल्हारा शहरात ठिकठिकाणीदूध डेअरी निर्माण झालेल्या दिसतात. केवळ पैसा कमावण्याच्या नादात दूध वाल्यांकडून ग्राहकांना पाण्याच्या भेसळीसोबतच इतरही विषारी औषधांची भेसळयुक्त दुधाची विक्री केली जात असल्याचे समजते असे असतांना देखील अन्न व औषध प्रशासन विभाग मात्र मूग गिळून आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या १९ डिसेंबरपर्यंत मुदत

**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना २०२३ - २४ आणि २०२४- २५ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या. परंतु, कागदपत्रांतील त्रुटींमुळे कार्यालयाच्या स्तरावर प्रलंबित असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी १९ डिसेंबरपर्यंत त्रुटी पूर्ण कराव्यात, असे आवाहन समाज कल्याण विभागाने केले आहे. राज्य शासनाने शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी थेट आर्थिक मदत देण्यासाठी 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' सुरू केली

### प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेने दिले धरणे!

अकोला : विविध मागण्यांसाठी प्रहार दिव्यांग क्रांती संस्था, अकोला जिल्ह्याच्या वतीने शुक्रवार, १२ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे देण्यात आले. मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आले. स्थानिक आमदार निधीतील ३० लाख रुपयांपर्यंतचा निधी दिव्यांग साहाय्यासाठीवापरण्याची तरतूद आहे. त्यानुसार दिव्यांगांसाठी निधी खर्च करण्याचे निर्देश देण्यात यावेत आदी मागण्यांसाठी प्रहार दिव्यांग क्रांती संस्था अकोला जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे देण्यात आले. संबंधित मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील यांना सादर करण्यात आले. या धरणे आंदोलनात संस्थेचे जिल्हाध्यक्ष सैयद मोइन अली, सै. नूर अली आदी उपस्थित होते.

# अकोल्याचे किमान तापमान ११.७ अंशांवर

### थंडीत थोडीशी घट; दुपारनंतर उन्हामुळे दिलासा

**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :** अकोला शहरासह संपूर्ण जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून जाणवत असलेली थंडी शनिवारी काहीशी कमी झाल्याचे चित्र दिसून आले. सलग दोन दिवस १० अंश सेल्सिअसच्या आसपास असलेले किमान तापमान शनिवारी ११.७ अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले. त्याचवेळी शहराचे कमाल तापमान ३१.४ अंश सेल्सिअस इतके नोंदले गेले. पहाटेच्या वेळेस थंडीची तीव्रता अद्याप कायम असून, सकाळच्या सुमारास दाट धुक्याचे वातावरण पाहायला मिळत आहे. मात्र दुपारनंतर सूर्यप्रकाशात वाढ झाल्याने गारठ्यात काही प्रमाणात घट झाल्याचे नागरिकांना जाणवले. त्यामुळे गेल्या काही दिवसांच्या तुलनेत दिवसा हवामान अधिक आल्हाददायक झाले आहे.

मागील दिवसांत वाढलेल्या थंडीमुळे नागरिकांनी उबदार कपड्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू केला होता. हवामानातील या बदलाचा परिणाम शेती क्षेत्रावरही जाणवत असून, काही भागांत कापूस तसेच भाजीपाला पिकांवर थंडीचा परिणाम दिसून येत आहे. शेतकरी वर्ग हवामानातील पुढील बदलांकडे लक्ष ठेवून आहे. एकूणच, अकोला शहरात थंडी कायम असली तरी तापमानात झालेल्या या थोड्याशा वाढीमुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळाल्याचे चित्र आहे.

# दुचाकी चोरीच्या घटनेत वाढ; नागरिक धास्तावले

**▪तेल्हारा,दि १४ (प्रतिनिधी) :** शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून दुचाकी चोरीची घटना समोर आली आहे. एंडली येथील शेतकरी प्रशांत हिंमतराव पुनसे यांनी याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. शहरात होत असलेल्या सततच्या दुचाकी चोरीच्या घटनेने नागरिक धास्तावले आहेत. तक्रारदार प्रशांत पुनसे यांच्या मालकीची दुचाकी क्रमांक एमएच ३० एपी ३११८ असून ही ९ डिसेंबर रोजी दुपारी ३.३० वाजेच्या सुमारास अकोल्यावरुन काम आटोपून परत येताना मूर्तिजापूर येथील राष्ट्रीय महामार्गाजवळील पेट्रोल पंपाच्या बाजूला, हॉटेल वैशाली शेजारी त्यांनी दुचाकी उभी करून जेवणासाठी हॉटेलमध्ये गेले. मात्र जेवण आटोपून बाहेर आल्यानंतर त्यांची दुचाकी त्या ठिकाणी आढळून आली नाही. यानंतर त्यांनी आजूबाजूच्या परिसरात तसेच मूर्तिजापूर तालुक्यातील गावांमध्ये शोध घेतला; मात्र दुचाकी मिळून आली नाही. अज्ञात चोरट्याने सदर ठिकाणाहून दुचाकी चोरून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. चोरीस गेलेल्या दुचाकीची किंमत अंदाजे २५ हजार रुपये असल्याचे सांगितल्या जाते. या प्रकरणी मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली असून पुढील तपास पोलीस सुरू आहे.

# अकोला जिल्हा कॉँग्रेस कमिटीच्या सोशल मीडिया अध्यक्षपदी अनिल मालगे यांची नियुक्ति

**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमेटीचे अध्यक्ष हर्षवर्धनजी सपकाळ यांच्या आदेशावरून अकोला जिल्हा कॉँग्रेस कमिटीच्या सोशल मीडियाच्या अध्यक्ष पदी अनिल मालगे यांची नियुक्ति करन्यात अली आहे अखिल भारतीय कॉँग्रेस कमिटी सोशल मीडिया विभागाच्या राष्ट्रीय अध्यक्षा मा. श्रीमती सुप्रियाजी श्रीनेत यांचे विचार तळागळापर्यंत पोहोचविण्यासाठी आपण भारीव कार्य कराल व सोशल मीडिया मार्फत कांग्रेस पक्ष संघटना मजबूतीने उभी कराल हा विश्वास आहे.

असे मत माननीय हर्षिकेश पाटील अध्यक्ष प्रदेश सोशल मीडिया विभाग यांनी व्यक्त केले आहे अनिल मालगे यांनी आपल्या नियुक्तीचे श्रेय ,महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे महासचिव मार्गदर्शक प्रकाश भाऊ तायडे वअकोला पश्चिमचे लोकप्रिय आमदार साजिद खान पठाण,



कॉँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष अशोक मानकर महानगर अध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे यांना दिले आहे. कॉँग्रेस कमिटीच्या सोशल मीडिया जिल्हाध्यक्षाची जबाबदारी दिल्याबद्दल पक्षाच्या सर्व नेत्यांची आभार व्यक्त करून अकोला जिल्ह्यात सोशल मीडियाच्या माध्यमातून कॉँग्रेसला अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासनअनिल मालगे यांनी दिली आहे

तहसिल कार्यालय,तेल्हारा
**जाहिरात**
तहसिल कार्यालय तेल्हारा येथील आवाराला संरक्षण भिंतीचे बांधकामात बाधित होणाऱ्या आडजात झाडांचा जाहिर लिलाव दिनांक २२/१२/२०२५ रोजी करण्यात येणार आहे. त्याबाबतच्या अटी व शर्ती कार्यालयीन दिवशी (सुटीच्या दिवसाव्यतिरीक्त) तहसिल कार्यालय तेल्हारा व उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग तेल्हारा यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर दिनांक १५/१२/२०२५ ते १९/१२/२०२५ या कालावधीत पहावयास मिळतील.
(समाधान सोनवणे)
तहसिलदार तेल्हारा
विमाका/अम./जाहि/७९३/२०२५-२०२६

# डॉ पंजाबराव देशमुख क़ीडा महोत्सवात श्री शिवाजी हायस्कूल तेल्हाराचा दणदणीत विजय

**▪तेल्हारा,दि १४ (प्रतिनिधी) :** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांनी आयोजित केलेल्या डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंतीनिमित्त संस्थेच्या अंतर्गत अकोला विभाग मधिल माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या क़ीडा स्पर्धा महोत्सव आयोजित केला होता.

अकोला येथील श्री शिवाजी विद्यालय शहर शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित स्पर्धा वसंत देसाई स्टेडियम अकोला येथे संपन्न झाल्या यामध्ये श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा येथील स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता यामध्ये ब गटात मुलींच्या संघाने विभागातून प्रथम क्रमांक पटकावला आहे




तर गटातच हॉलीबॉल खेळात मुलाच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला मैदानी खेळ प्रकारात लांब उडी गोळा फेक ४०० मीटर धावणे मध्ये यश संपादन केले आहे.लांब उडी मध्ये आकाश गवारगुरु गोळा फेक मध्ये कु प्रज्ञा गवारगुरू,४०० मीटर धावणे कु मिनाक्षी पोहरकार यांनी यश संपादन केले आहे कबड्डी स्पर्धा मध्ये मुली मुले यांना चांगली लढत दिली आहे व्हि डि गावंडे मुख्याध्यापक यांच्या नेतृत्वाखाली खेळाडू सहभागी झाले होते

सर्व खेळाडू ना मार्गदर्शन शांतीकुमार सावरकर क़ीडा शिक्षक, केले आहे तर खेळाडू ना प्रोत्साहन देण्यासाठी सुनील वंजारी बी जी पवार,बळीराम कुवारे, तूषार जाधव अंकेश भांबुरकर, भारत भोयर,सौ शर्वरी हिंगणकर, अभिजित हिंगणकर,कु प्रियंका नंदाने मॅडम,श्रीधर लोखंडे गाढवे सर गजानन गावंडे विजय दहे तेजराव कडू यांनी केले आहे यशस्वी खेळाडू चे अभिनंदन अँड गजाननराव पुडकर उपाध्यक्ष, केशवराव मेतकर उपाध्यक्ष,सुरेशदादा खोटरे कार्यकारिणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती,उद्धवराव विखे शाळा तपासणी अधिकारी प्रकाश अंधारे शाळा तपासणी अधिकारी, व्हि डी गावंडे मुख्याध्यापक सुधीर बापू देशमुख, शाळा समिती सदस्य, तसेच तेल्हारा तालुक्यातील सर्व आजिव सदस्य ,माता पालक मंडळी शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी अभिनंदन केले आहे.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, ‍मला स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९*** (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )

# हल्लेखोर प्राण्यांचा सरकारला सुचक सल्ला,आतातरी जंगल वाचवा अन्यथा गंभीर परिणाम भोगण्यास तयार रहा!



बिबट्या शहरात का येतो,याचा अभ्यास सरकारने कधी केला का?सरकारला आताच शेळ्या का आठवल्या ? असे अनेक प्रश्न सध्याच्या परिस्थितीत उपस्थित होत आहे. सध्या राज्यभरात बिबट्याने मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला आहे.नुकताच नागपूरात दिनांक १० तारखेला बिबट्याने ७ जणांना गंभीररित्या जखमी केले.त्यामुळे बिबट्याचे हल्ले रोखण्यासाठी जंगलात १ कोटी शेळ्या सोडण्याची घोषणा वनमंत्री गणेश नाईक यांनी केली.परंतु प्रश्न निर्माण होतो की एक कोटी शेळ्या येणार कोठुन आणि आपण कुत्रेच पकडु शकत नाहीत तर एक कोटी शेळ्या सोडल्याने सरकारला बिबटे सापडतील असे मला वाटत नाही आणि सापडले तर ठेवणार कोठे.कारण विधिमंडळ परिसरात रेड कार्पेटवर भटके कुत्रे बिनधास्त फिरत होते हे कुत्रे पकडण्यास मनपा कर्मचाऱ्यांनी भरपूर मेहनत घेतली पण कुत्रे पकडण्यात अपयश आले.त्यामुळे आपण कुत्रे पकडू शकत नाही तर बिबटे कसे काय पकडणार हाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.आपण जंगल संपदा वाढविली असती आणि जंगल कटाई रोखली असती तर आपल्याला गावात किंवा शहरात बिबट्या किंवा हिंसक पशु दिसलेच नसते हेही तितकेच सत्य आहे.त्यामुळे बिबट्यासाठी शेळ्यांचा बळी आणि जंगलतोडीमुळे बिबट्याकडुन शेतकरी, शेतमजूर, गावातील नागरिक, शहरातील नागरिक, पाळीव प्राणी यांचा बळी हे कितपत योग्य म्हणावे! त्याकरिता सरकारने जंगल वाचविले तर सर्वांचाच जीव आपोआप वाचले व सुरक्षित राहील. पर्यावरण प्रेमी, सामाजिक संघटना, गावकरी,राज्यातील नागरिकांना आणि स्वतः निसर्ग जंगल तोडीचा कडाडून विरोध करीत आहेत.तरीही विकासाच्या नावावर किंवा धार्मिकतेच्या नावांवर मोठ्या प्रमाणात जंगलतोड व वृक्षांची कत्तल सुरूच आहे आणि हे संपूर्ण दृश्य सरकार, लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी उघड्या डोळ्यांनी पाहत आहे.तरीही जंगल कटाई अजुन पर्यंत थांबलेली नाही.बिबट्या शहरात किंवा गावात धाव का घेत आहेत याची कल्पना सरकार आहे तरी शहरीकरण,औद्योगिकरण, धार्मिकतेच्या नावांवर मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढत आहे.आज राज्यातीलच नाही तर देशातील प्रत्येक शहरांचा विचार केला तर प्रत्येक शहराच्या मुख्य पॉईंट्स पासुन ४० किलोमीटर अंतरापर्यंत शहरीकरण व औद्योगिकरण झालेले आहे.आपण आपल्या सुखसुविधांसाठी जंगल तोडून शहरीकरण केले हे ठीक आहे.परंतु बिबट्या किंवा इतर प्राण्यांचा विचार सरकारने कधी केला का ?की त्यांचे काय होईल ?या मुक्या पशुपक्ष्यांना कोण अन्नपाणी देयील याचा विचार राज्यातील कोणत्याही सरकारने केलाच नाही.त्याचेच प्रायश्चित्त म्हणजे आज बिबट्यानी राज्यातील प्रत्येक शहरांमध्ये व गावांमध्ये धुमाकूळ घालत आहे.आज बिबट्या आपल्या अन्नासाठी शहरात येतो आणि सरकारला खडबडून जाग येतो, आणि सरकार म्हणते की बिबट्यांचा शहरातील हैदोस पहाता त्यांच्या खाद्यपुर्तीसाठी एक कोटी शेळ्या जंगलात सोडू.अहो तुम्ही वरच्यावर जंगल कापत रहाल तर शेळ्या कुठे सोडणार?आपण जर शेळ्या जंगलात सोडत असाल तर ही तर पाळीव प्राण्यांची हत्याच म्हणावी लागेल. आता शहरीकरण थांबायला तयार नाही, त्यामुळे सरकारने बिबट्यांना पाळीव प्राण्यांचा दर्जा दिला तर बरे होईल.कारण शेळ्या जंगलात सोडण्यापेक्षा आम्ही घरीच त्यांना जेवण देवू शकतो.सरकारने सर्वच गोष्टींचा गांभीर्याने विचार करने गरजेचे आहे.कारण देशासह राज्यात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे, बिबट्यांची संख्या वाढत आहे,कुत्र्यांची संख्या वाढत आहे यावर ठोस पाऊल उचलने गरजेचे आहे.सरकारने जर जंगल वाचविले तर बिबट्या किंवा अन्य हिंसक पशु यांना शेळ्यांची सुध्दा गरज भासणार नाही.सरकार चुकीचा अंदाज लावत आहे की बिबट्या शहरात किंवा गावात येतो.परंतु तसे अजीबात नाही कारण बिबट्या किंवा अन्य पशुपक्षी यांच्या घरांवर आपणच म्हणजे मानवजाती व मुख्यत्वे करून सरकारने अतिक्रमण केले आहे म्हणून बिबट्या सारखे अनेक हिंसक पशु शहराकडे किंवा गावाकडे धाव घेतांना दिसतात व यामुळे जीवीत हाणीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.यात बिबट्याचा काय दोष! बिबट्या हा आपली खाद्यपुर्तीसाठी शहरात येत आहे,म्हणून काय त्यांच्या खांद्यपुर्तीसाठी आपण शेळ्यांचा वापर करणार काय? म्हणजे एकाचा जीव वाचवण्यासाठी दुसऱ्याचा जीव घ्यायचा हा कुठला न्याय ?ही हत्याच म्हणावी लागेल !त्यापेक्षा सरकारने जंगल कटाई व वृक्षतोड थांबविली तर बिबट्यांचेही प्राण वाचतील व शेळ्यांचा सुध्दा जीव वाचेल.सरकार साधुग्रामसाठी तपोवनातील १८०० झाडांची हत्या करण्याच्या तयारीत आहे.याचा पुढे नाशिककरांसाठी काय विपरीत परिणाम होईल हे आज राज्यातील अनेक भागात बिबट्या दाखवित आहे.त्यामुळे बिबट्यांची वाढती संख्या, जंगल कटाई आणि बिबट्यांच्या खाद्यपुर्तीसाठी शेळ्यांची पेशकस हे कितपत योग्य आहे याचा सरकारने गांभीर्याने विचार केला पाहिजे व संपूर्ण हिंसक पशुंचे वास्तव जंगलात कसे राहील याचा अभ्यास पुर्वक विचार सरकारने केला पाहिजे.कारण गेल्या काही वर्षांपासून बिबट्या शहरात व गावात येत आहे.याचेच प्रायश्चित्त म्हणून जंगलतोडीमुळे शेतकरी, गुराखी,पाळीव प्राणी यांची आतापर्यंत मोठ्या प्रमाणात जीवित हानी झाली आहे.सरकारने विचार करायला हवा की, मोजक्या बिबट्यासाठी एक कोटी शेळ्यांचा हत्या करायची हे कितपत योग्य म्हणावे.आपण वनसंरक्षक कायद्यानुसार जंगली पशुंना मारू शकत नाही.परंतु बिबट्यांचा शहरात व गावातील वाढता हैदोस पहाता सर्वसामान्यांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारने व वनविभागाने स्वीकारली पाहिजे.कारण कायदे बनविणारे सरकारच त्यामुळे सरकारने मानव, बिबट्या व शेळ्यांना वाचविण्याची जबाबदारी स्वीकारावी.फक्त तोंडी आश्वासन देवून चालणार नाही तर ठोस उपाययोजना केली पाहिजे.आपण कायद्यानुसार बिबट्यांला मारूही शकत नाही.त्यामुळे यावर सरकारजवळ एकच उपाय आहे तो म्हणजे जंगल वाचविणे.बिबट्यांना शेळ्या खाऊ घाला किंवा आणखी काही खाऊ घाला जोपर्यंत जंगलतोड थांबणार नाही तोपर्यंत हिंसक पशुंचे आक्रमक सुरूच राहील सावधान!



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार) नागपूर.
मो.नं.९९२१६९०७७९

भिवापूर तालुक्यात वाघांचा मुक्त संचार सुरू असल्याचे गावकरी, शेतमजूर, गुराखी, सामान्य नागरिक सांगत आहेत.याकडे वनविभाग दुर्लक्ष करीत आहे असा भिवापूर वासीयांचा आरोप सुध्दा केला आहे.या गंभीर समस्येकडे भिवापूर तालुक्यातील खरेदी-विक्रीसंघाने वनमंत्री गणेश नाईक यांना निवेदन सुध्दा दिले आहे.यावरून स्पष्ट होते की हिंसक पशुंचा मुक्त संचार राज्यातील अनेक भागात,जिल्ह्यांत,गाव खेड्यात, शहरात सुरूच आहे.परंतु यावर वनविभागाने अजुन पर्यंत ठोस उपाययोजना केल्याचे दिसत नाही.हल्लेखोर प्राणी आता सरकारला सल्ला देत आहे की, आताही जंगल वाचवा.त्यामुळे वनविभाग व सरकारला आग्रहाची विनंती आहे की, आपल्याला हिंसक पशु पासुन जर सुरक्षित रहायचे असेल तर प्रथम जंगल संपदा वाढविली पाहिजे.जय हिंद!

# अवैध घुसखोरी रोखायलाच हवी !



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

राजधानी दिल्लीत सुरु असलेल्या सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाला संबोधित करताना भाजपचे प्रवक्ता प्रदीप भंडारी यांनी भारतात होणाऱ्या अवैध घुसखोरीची वास्तव समजावून सांगितले. घुसखोरीच्या समस्येवर आजच उपाययोजना काढली नाही, तर भविष्यातील कोणकोणत्या संकटांना सामोरे जावे लागू शकते याचा पाढाच त्यांनी यावेळी वाचला. अवैध घुसखोरी ही कोणत्याही राष्ट्रासाठी भविष्यातील फार मोठ्या राष्ट्रीय संकटाची सुरुवात असते ज्याचे गांभीर्य ओळखून त्यावर वेळीच कठोर उपाययोजना काढणे आवश्यक असते. घुसखोरीचे गंभीर परिणाम आज इंग्लड आणि फ्रान्ससारखी बलाढ्य राष्ट्रे भोगत आहेत. काही राष्ट्रांनी मात्र याबाबत वेळीच सजग होऊन घुसखोरांना देशाबाहेर हाकलण्याच्या मोहिमा आखल्या. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्तेवर येताच ४२ महत्वाचे निर्णय घेतले. देशात अपुऱ्या कागदपत्रांविना राहणाऱ्या विदेशी नागरिकांना त्यांच्या देशात घालवणे हा त्यापैकीच एक महत्वाचा निर्णय होता. या निर्णयामुळे कित्येक भारतीयांना पुन्हा हिंदुस्थानात यावे लागले. आजमितीला भारतात बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांनी कमाल मर्यादा ओलांडली आहे. सुरुवातीला प्रगतशील शहरांमध्ये रोजगाराच्या आशेने आलेले हे घुसखोर आज देशाच्या प्रत्येक राज्यात, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आणि काही अपवाद वगळता जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आणि तालुक्यातील प्रत्येक गावात शिरले आहेत.


भारतात आजतागायत १० कोटीहून अधिक बांगलादेशी नागरिकांनी घुसखोरी केल्याचा अंदाज जाणकार वर्तवतात. एवढ्या मोठ्या प्रमाणात घुसखोरी होत असताना सीमा सुरक्षा दलातील अधिकारी काय करत आहेत ? याचीही चौकशी होणे आज गरजेचे आहे. भारतातील मुस्लिमांची श्रद्धास्थाने असलेल्या मशिदी आणि दर्गे यांच्या उत्सवांच्या निमित्ताने भारतात येणाऱ्या बांगलादेशींपैकी अनेक जण पुन्हा त्यांच्या देशात जातच नाहीत असेही आता उजेडात आले आहे. लोकसंख्येच्या बाबतीत भारताने चीनला मागे टाकून जगात पहिला क्रमांक पटकावला ज्यामध्ये दुर्दैवाने बांगलादेशी घुसखोरांचाही मोठा वाटा आहे. भारतातील गुन्हेगारी क्षेत्रातही बांगलादेशी घुसखोरांचा मोठ्या प्रमाणात भरणा आहे. भारतात राहून देशविरोधी कारवाया, अमली पदार्थांची तस्करी, दंगली घडवणे, लूटमार करणे, भूखंड बळकावणे, विविध जिहाद राबवणे, अनैतिक व्यवसाय, यांसारख्या गुन्ह्यांमध्ये बांगलादेशी नागरिक पोलिसांच्या हाती सापडत आहेत. झोपडपट्टी दादा, लोकप्रतिनिधी आणि दलाल यांच्या मदतीने या घुसखोरांच्या निवाऱ्याची आणि रोजगाराची सोय होते. काही दिवसांतच त्यांना बनावट मतदान ओळखपत्र, रेशनकार्ड बनवून मिळते त्यामुळे बांगलादेशी असल्याचा संशय असूनही त्यांच्यावर कारवाई करणे पोलिसांना अवघड जाते. भारतात अवैधपणे येणाऱ्या बांगलादेशी आणि रोहिंग्या यांना आश्रय देणाऱ्या विविध टोळ्या आज कार्यरत आहे, ज्यांना देशाशी काही देणेघेणे नाही. कमिशनच्या बदल्यात या टोळ्या घुसखोरांच्या निवाऱ्याची आणि नोकरी व्यवसायाची सोय करतात. यांच्यापासून अनेक मुस्लिम वस्त्यांमध्ये या घुसखोरांना आश्रय आणि संरक्षण दिले जाते. त्यामुळे या वस्त्यांमध्ये शिरून घुसखोरांच्या विरोधात कारवाई करायला पोलीस धजावत नाहीत. खरेतर बांगलादेशी नागरिकांची घुसखोरी रोखावी यासाठी विशेष शोधमोहीम प्रत्येक पोलीस ठाण्याअंतर्गत राबवण्यात यावी, असे पोलिसांना आदेश आहेत. यामध्ये बांगलादेशी व्यक्ती शोधणे, त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करणे, त्यांचे साथीदार शोधणे, तसेच त्या सर्वांना परत पाठवणे आदी कामे येतात ; मात्र या आदेशाला पोलिसांकडूनच केराची टोपली दाखवली जात आहे. बांगलादेशात हिंदूंना वेचून त्यांचा छळ केला जात आहे, स्त्रियांवर अत्याचार होत आहेत, हिंदूंची मंदिरे फोडली जात आहेत आणि आपण मात्र देशाला पोखरणाऱ्या या बांगलादेशी घुसखोरांबाबत कोणतीही विशेष राबवत नाही आहोत. घुसखोरांच्या विरोधात पोलिसांकडून राबवल्या जाणाऱ्या नरमाईच्या धोरणावर न्यायालयानेही ताशेरे ओढले आहेत. तरीही पोलीस प्रशासनाकडून घुसखोरांच्या विरोधात कारवाई केली जात नाही. गेल्या काही दिवसांत केंद्र सरकारकडून '' (स्पेशल इन्टेन्सिव्ह रिव्हिजन) मोहिमे अंतर्गत कारवाई करताना काही राज्यांमध्ये चांगले परिणाम पाहायला मिळाले आहेत. फॉर्म भरण्यास सांगितल्यावर अवैधपणे भारतात राहणारे बांगलादेशी स्वतःहून देश सोडून जाऊ लागले आहेत. ही मोहीम आता देशातील प्रत्येक राज्यात आणि जिल्ह्यात राबवणे आवश्यक असून ही मोहीम राबवणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पाठीशी देशातील सुजाण नागरिकांनी खंबीरपणे उभे राहायला हवे !

# माणुसकीच्या नात्याने, माणसाची कर्तव्य कोणती?

आजकालचा माणूस आपली कर्तव्य व आपली जबाबदारी पूर्णपणे विसरून गेला आहे. स्वार्थी, कपटी, ढोंगी व लबाड लांडगा बनून केवळ आणि केवळ स्वतःचे हित साधण्याचा पुरेपूर प्रयत्न करत आहे. लोकांना फसवून, अफरातफर करून, वाईट मार्गाने पैसा गोळा करून आणि कामात भ्रष्टाचार करून माणूस श्रीमंत होण्याचा प्लॅन आखत आहे. केवळ स्वतःचेच भले व्हावे आणि दुसऱ्यांचे काही का होईना, अशी लोकांची मानसिकता बनली आहे. म्हणजे हल्ली लोक फक्त स्वतःचा आणि स्वतःच्या घर परिवाराचा विचार करून जीवन जगत आहेत. दुसऱ्यांचे काहीही होवो, फक्त आपण आणि आपला परिवार सुखी व आनंदी राहावा, हाच विचार करून आजकालचे लोक जीवनाची वाटचाल करत आहेत. काही माणसांना वाटत असते की, वाटोळे व नुकसान झाले तरी दुसऱ्यांचे व्हावे, आपले होऊ नये, ही भावना ठेवून जगणारे लोक सध्या खूप वाढले आहेत. कोणाचा अपघात झाला, कोणी भीषण संकटात अडकला, कोणावर दुःखाचा डोंगर कोसळला, कोणी आर्थिक संकटात अडकला, कोणी मोठ्या आजाराने दवाखान्यात ॲडमिट झाला, कोण्या मुलीवर बलात्कार होऊ लागला किंवा कोणत्या माणसावर अन्याय होऊ लागला, तर माणुसकीच्या नात्याने अशा अडचणीत सापडलेल्या गरजू लोकांना धावत जाऊन मदतीचा हात देणे, त्यांना त्या संकटातून मुक्त करून त्यांच्यावर आलेले संकट दूर करणे, हे खऱ्या माणसाचे कर्तव्य असते. कारण माणुसकीच्या नात्याने सामाजिक बांधिलकी म्हणून त्यांना आर्थिक व मानसिक आधार दिला तरच या जगात माणुसकी जिवंत राहणार आहे. परंतु खेदाची बाब म्हणजे, आजकाल माणूस स्वार्थी व लबाड लांडगा झाल्यामुळे कोणत्या माणसावर भरवसा ठेवावा ? नेमके हेच कळणे अवघड झाले आहे. हल्ली माणसाने माणुसकीची सीमा पार केली आहे. आणि माणूस माणसासारखा न राहता व माणसासारखा व्यवहार न करता स्वार्थापायी लबाड बोलून व खोटे बोलून माणुसकीला कलंक लावत आहे. माणसाच्या अंगी असलेले माणुसकीचे सर्व गुण सध्या लुप्त होऊन माणसांमध्ये स्वार्थ खूप बोकाळला आहे. माणूस केवळ स्वतःचा आणि बायको लेकरांचा विचार करून जीवन जगत आहे. दुसऱ्यांचे काही का होईना, फक्त आपले आणि आपल्या मुलाबाळांचे कसे चांगले होईल? हेच आजकालचा माणूस बघत आहे. माणुसकीच्या नात्याने माणसाची कर्तव्य कोणती? माणसाने माणसासाठी सुखदुःखात व संकट काळात काय करायला हवे ? कोणत्यातरी आशेने घरी चालून आलेल्या भिकाऱ्याला किंवा गरीब अनाथ मुलांना दानधर्म करण्याची मानसिकता आत्ताच्या लोकांमध्ये राहिली नाही. माणसाला माणसाची कर्तव्य व जबाबदारी काय असते ? याचा थांगपत्ता त्यांना जराही राहिला नाही. एकेकाळी आपल्या देशात कुठेही जा, माणुसकीच माणुसकी पाहायला मिळायची. माणूस माणसाला किंमत द्यायचा. सुखदुःखात व वाईट काळात माणूस माणसाच्या मदतीला सुसाट वेगाने धावत यायचा. तेव्हाच्या माणसांना माणसांची कर्तव्य व जबाबदारी काय असते? आणि गरजू व संकटात सापडलेल्या माणसांना कोणती मदत करायची असते? याचे पुरेपूर नॉलेज जुन्या माणसांना होते. तेव्हाच्या माणसांमध्ये माणुसकीचे सर्व गुण ठासून भरलेले होते. त्याकाळी माणसे म्हणावे तेवढे शिकलेले नव्हते, अल्पशिक्षित व निरक्षर असून सुद्धा तेव्हाच्या माणसांना माणुसकीच्या नात्याने, माणसांची कर्तव्य व जबाबदारी काय असते? याची पूर्ण जाणीव होती. आता देशात सुशिक्षित लोकांचे प्रमाण खूप वाढले आहे. आणि निरक्षर लोकांचा वाढता आकडा कमी झाला आहे. तेव्हा प्रश्न पडतो की, सुशिक्षित लोक एवढे शिक्षण घेऊन देखील न शिकलेल्या अज्ञानी माणसासारखे का वागतात? त्यांना माणुसकी धर्म का कळत नाही? माणसाने माणसाशी माणसासारखे वागले पाहिजे, हे त्यांना का कळत नाही? मी म्हणत नाही, की सगळीच माणसे माणुसकीला विसरून वागत आहेत. या पृथ्वीतलावर माणुसकीला जीवापाड जपणारी माणसे अजूनही जिवंत आहेत, परंतु त्यांचे प्रमाण सध्या कमी झाले आहे आणि माणुसकीला विसरून स्वार्थ साधणाऱ्या लबाड लांडग्यांचा सुळसुळाट वाढला आहे. म्हणूनच देशात जिकडे तिकडे बलात्कार, व्याभिचार, अनाचार आणि भ्रष्टाचार प्रचंड फोफावला आहे. रोज देशाच्या कानाकोपऱ्यात कुठे ना कुठेतरी बलात्कार होतोच. पाच वर्षाच्या निष्पाप व निरागस चिमुकली पासून ते वयोवृद्ध आजीपर्यंत बलात्कार करणारे महाभाग देशात खूप आहेत. शासनाने अशा नाराधमांचा बंदोबस्त वेळीच करून त्यांना कठोर शिक्षा द्यावी आणि पीडित महिलेला व मुलीला न्याय द्यावा. माणुसकीच्या नात्यामध्ये आई-वडिलांचेनाते हे आपल्यासाठी खूप महत्त्वाचे असते. आई-वडिलांनीआपल्याला जन्म दिलेला असतो, बोटाला धरून चालायला शिकवलेले असते, थानाचे दूध पाजून सशक्त केलेले असते आणि त्यांना उच्चशिक्षित करून मोठ्या पदावर बसवलेले असते. तरीसुद्धा आजकालची मुले आई-वडिलांच्या उपकाराची जाणीव न ठेवता आई-वडिलांपासूनअलिप्त राहून बायको मुलांसमवेत आनंदाने जीवन जगत आहेत. त्यांचे आई-वडीलमात्र वृद्धाश्रमात खितपत पडून शेवटच्या घटका मोजत आहेत. तरीसुद्धा बरीच मुले आई-वडिलांनभेटण्यासाठी सुद्धा येत नाही. लांबूनच फोनवर दोन गोष्टी बोलायच्या आणि फोन ठेवायचा. ही मानवतेला न शोभणारी अत्यंत दुःखद बाब आहे. आई-वडिलांनी लहानाचे मोठे करून व त्यांना शिक्षणाचे बाळकडू पाजून नोकरीला लावले, तीच मुले जर आई-वडिलांना म्हातारपणात आधार न देता वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवत असतील तर खरंच या देशात माणुसकी जिवंत नाही असेच म्हणावे लागेल. तसेच भावंडांमध्ये शेतीच्या कमी जास्त वाटणीवरून जोराचे भांडण तंटे चालू आहेत. बरेच भाऊ घरासाठी व जमिनीसाठी सख्ख्या भावासोबत पक्के वैर धरून एकमेकांना संपवण्यासाठी एकमेकांवर टपून बसले आहेत. भावकीतील चार भाऊ तेव्हाच सोबत असतात, जेव्हा पाचवा भाऊ मेल्यानंतर खांद्यावर असतो. म्हणजे शेतीच्या किंवा घराच्या भांडणावरून सख्खे भाऊ एकमेकांचे पक्के वैरी बनून मरेपर्यंत एकमेकांचे तोंड बघत नाहीत. मेल्यावर मात्र भावाला खांदा द्यायला व भावाला पाणी पाजायला हमखास येतात. मेल्यानंतर भावाला खांदा देण्यात आणि पाणी पाजण्यात काय अर्थ? मेल्यावर त्याला काय कळणार , की माझा भाऊ माझ्यासाठी खांदा देत आहे की,पाणी पाजत आहे म्हणून. म्हणून माणसांनो, माणसाची कर्तव्य व जबाबदारी ओळखून माणसासारखे वर्तन करा आणि या देशातून लोप पावत चाललेली माणुसकी पुन्हा जिवंत करा...

बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी ता अहमदपूर जिल्हा लातूर
मो.७४९८७१५६६१

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल



भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज ७५ वि पुण्यतिथी. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. वकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना विनम्र अभिवादन!

# डिजिटल युगातील कामगाराचे स्वातंत्र्य : राईट टू डिस्कनेक्ट विधेयक २०२५ चा समाजशास्त्रीय मागोवा

आजचे जग झपाट्याने बदलत आहे. डिजिटल तंत्रज्ञानाने माणसाचे जीवन अधिक सुलभ, वेगवान आणि जोडलेले गेले आहे ; परंतु याच तंत्रज्ञानाने काम आणि खासगी आयुष्य यांमधील सीमारेषा पुसट केली आहे. मोबाइल फोन, लॅपटॉप, ई-मेलव्हॉट्सॲप, व्हिडीओ कॉल, ऑनलाईन प्लॅटफॉर्म यांमुळे कामाची वेळ आता ठराविक कार्यालयीन तासांपुरती मर्यादित राहिलेली नाही. कार्यालय बंद झाले तरी काम मनातून सुटत नाही, सुट्टी असली तरी ऑनलाईन राहण्याचा दबाव कायम असतो. याच पार्श्वभूमीवर राईट टू डिस्कनेक्ट बिल २०२५ हे विधेयक अत्यंत महत्त्वाचे ठरते. हे विधेयक म्हणजे केवळ कर्मचाऱ्यांचा एक नवीन हक्क नाही, तर आधुनिक समाजाच्या कामकाज संस्कृतीवर पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित करणारा सामाजिक दस्तऐवज आहे

राईट टू डिस्कनेक्ट या संकल्पनेचा अर्थ साधा आहे की कामाचे ठराविक तास संपल्यानंतर कर्मचारी किंवा कामगार यांना कार्यालयीन ई-मेल,फोन कॉल, मेसेज, ऑनलाईन मीटिंग किंवा तत्सम डिजिटल संपर्कांपासून दूर राहण्याचा अधिकार असावा. म्हणजेच, कामाच्या वेळेनंतर कर्मचारी ऑफलाइन राहू शकतो आणि त्यासाठी त्याच्यावर कोणताही अप्रत्यक्ष दबाव, शिक्षा किंवा नकारात्मक मूल्यांकन होऊ नये. आजच्या काळात अनेक कर्मचारी शारीरिकदृष्ट्या कार्यालयाबाहेर असतात, पण मानसिकदृष्ट्या सतत कामाशी जोडलेले असतात. हा सततचा मानसिक ताण, उपलब्ध राहण्याची अपेक्षा आणि तत्काळ प्रतिसाद देण्याची सक्ती हळूहळू व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर, कौटुंबिक जीवनावर आणि सामाजिक नातेसंबंधांवर गंभीर परिणाम करते. त्यामुळे राईट टू डिस्कनेक्ट ही केवळ कामगार कायद्याची तरतूद नसून मानसिक आरोग्य, मानवी प्रतिष्ठा आणि सामाजिक संतुलनाशी जोडलेली मागणी आहे

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिल्यास कामाचे स्वरूप हे नेहमीच सामाजिक रचनेशी जोडलेले राहिले आहे. औद्योगिक क्रांतीच्या काळात कामाची वेळ, कारखान्याचे तास, कामगारांचे श्रम हे स्पष्टपणे ठरवले गेले. पुढे कार्यालयीन संस्कृती आली तेव्हा नऊ ते पाच ही वेळ समाजमान्य झाली. पण डिजिटल युगात ही चौकट मोडली आहे. वर्क फ्रॉम होम, हायब्रिड वर्क, फ्रीलान्सिंग, गिग इकॉनॉमी यांसारख्या संकल्पनांनी काम अधिक लवचिक केले असले, तरी त्याच वेळी कामगारांचे संरक्षण कमकुवत झाले आहे. कर्मचारी कधीही, कुठूनही काम करू शकतो, ही सुविधा जितकी आकर्षक आहे, तितकीच ती शोषणाची शक्यता वाढवणारी आहे. कारण कामाची वेळ ठरलेली नसल्यामुळे कामगार कायम उपलब्ध राहील, अशी अपेक्षा निर्माण होते. राईट टू डिस्कनेक्ट बिल या बदलत्या कामसंस्कृतीत कामगारांचे हक्क पुन्हा ठोसपणे अधोरेखित करते

या विधेयकाचा मुख्य उद्देश म्हणजे काम आणि वैयक्तिक आयुष्य यांमधील संतुलन पुन्हा प्रस्थापित करणे. आधुनिक समाजात व्यक्तीची ओळख केवळ तिच्या कामगिरीवर ठरवली जात आहे. कामाच्या बाहेरचे आयुष्य कुटुंब, विश्रांती, आरोग्य, सामाजिक सहभाग या गोष्टी दुय्यम ठरत चालल्या आहेत. समाजशास्त्र सांगते की जेव्हा व्यक्तीचे सामाजिक आयुष्य आकुंचन पावते, तेव्हा समाजात तणाव, नैराश्य, एकटेपणा आणि मानसिक आजार वाढतात. राईट टू डिस्कनेक्ट हा हक्क व्यक्तीला तिचे आयुष्य केवळ कामापुरते मर्यादित न ठेवता पूर्ण मानव म्हणून जगण्याची मुभा देतो. काम हे जीवनाचा एक भाग आहे, संपूर्ण जीवन नाही हा संदेश या विधेयकातून अधोरेखित होतो.



डॉ. राजेंद्र बगाटे
मो. ९९६०१०३५८२,
ईमेल :
bagate.rajendra5@gmail.com

या विधेयकात कामगार आणि नियोक्ता यांच्यातील नातेसंबंध नव्या पद्धतीने मांडलेले दिसतात. पारंपरिक अर्थाने नियोक्ता म्हणजे आदेश देणारा आणि कर्मचारी म्हणजे त्याचे पालन करणारा, अशी श्रेणीबद्ध रचना होती. परंतु आधुनिक लोकशाही समाजात कामगारांचे हक्क, प्रतिष्ठा आणि स्वायत्तता मान्य केली जाते. राईट टू डिस्कनेक्ट बिल नियोक्त्यांनाही जबाबदार बनवते. कामाचे तास, आपत्कालीन परिस्थिती, डिजिटल संवादाचे नियम, कर्मचाऱ्यांच्या विश्रांतीचा कालावधी या सर्व बाबी स्पष्टपणे ठरवण्याची अपेक्षा या विधेयकातून व्यक्त होते. त्यामुळे कामाचे नियोजन अधिक शिस्तबद्ध आणि मानवीकेंद्रित होण्याची शक्यता निर्माण होते

महिलांच्या दृष्टीने या विधेयकाचे महत्त्व अधिक आहे. भारतीय समाजात महिलांवर घरकाम, मुलांची जबाबदारी, वृद्धांची काळजी आणि नोकरी असा दुहेरी किंवा तिहेरी भार असतो. वर्क फ्रॉम होमच्या काळात अनेक महिलांना कार्यालयीन काम आणि घरगुती जबाबदाऱ्या एकाच वेळी सांभाळाव्या लागल्या आहेत. कामाची ठराविक वेळ नसल्यामुळे महिलांच्या विश्रांतीचा वेळ जवळजवळ नाहीसा झाला. राईट टू डिस्कनेक्ट हक्क महिलांना मानसिक मोकळीक देऊ शकतो, कारण तो कामाच्या अपेक्षा मर्यादित करतो आणि वैयक्तिक वेळेचा सन्मान करतो. समाजशास्त्रीयदृष्ट्या हा हक्क लिंगसमतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकतो

तरुण पिढीसाठीही हे विधेयक तितकेच महत्त्वाचे आहे. आजची तरुणाई स्पर्धात्मक वातावरणात काम करत आहे. सतत ऑनलाईन राहणे, तत्काळ प्रतिसाद देणे, जास्त वेळ काम करणे हेच यशाचे मोजमाप बनले आहे. या दबावामुळे बर्नआउट, चिंता, नैराश्य, झोपेचे विकार यांचे प्रमाण वाढत आहे. समाजशास्त्रात याला डिजिटल थकवा असे म्हटले जाते. राईट टू डिस्कनेक्ट बिल तरुण पिढीला हे शिकवते की स्वतःची काळजी घेणे, विश्रांती घेणे आणि कामापासून दूर राहणे हे कमजोरी नाही, तर निरोगी जीवनाचे लक्षण आहे.

या विधेयकाचा प्रभाव केवळ वैयक्तिक पातळीवर मर्यादित राहत नाही, तर तो संपूर्ण समाजावर परिणाम करतो. जेव्हा कर्मचारी मानसिकदृष्ट्या तणावमुक्त असतो, तेव्हा तो अधिक सर्जनशील, उत्पादक आणि समाधानी असतो. याचा फायदा उद्योगांनाही होतो. कामगारांचे आरोग्य बिघडले, तर उत्पादकता घटते, अनुपस्थिती वाढते आणि सामाजिक आरोग्यव्यवस्थेवर ताण येतो. त्यामुळे राईट टू डिस्कनेक्ट हा हक्क अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेही दीर्घकालीनदृष्ट्या फायदेशीर ठरू शकतो.

समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिल्यास हे विधेयक आधुनिक भांडवलशाही व्यवस्थेतील अति-उत्पादन आणि अति-कामा प्रवृत्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. सतत काम, सतत उपलब्धता आणि कार्यक्षमतेची अतिरेकी अपेक्षा ही माणसाला यंत्रासारखे वागवते. राईट टू डिस्कनेक्ट ही संकल्पना माणूस केंद्रस्थानी ठेवणाऱ्या विकासाच्या विचाराशी जोडलेली आहे. विकास म्हणजे केवळ आर्थिक आकडे नव्हेत, तर मानवी सुख, आरोग्य आणि सामाजिक नातेसंबंध यांचाही समावेश असावा, ही भूमिका या विधेयकातून अधोरेखित होते.


वर्तमानपत्राच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांपर्यंत या विधेयकाची माहिती पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. कारण अनेक कर्मचारी अजूनही हे मान्य करत नाहीत की कामाच्या वेळेनंतर नाही म्हणणे हा त्यांचा हक्क आहे. समाजात ही जाणीव निर्माण झाली, तर कामसंस्कृतीत बदल घडू शकतो. कार्यालयीन ई-मेलला तात्काळ उत्तर देणे ही निष्ठा नसून, विश्रांतीचा सन्मान करणे ही खरी जबाबदारी आहे, असा दृष्टिकोन विकसित होणे गरजेचे आहे. राईट टू डिस्कनेक्ट बिल हा बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे.

शेवटी असे म्हणता येईल की राईट टू डिस्कनेक्ट बिल २०२५ हे केवळ कायदेशीर तरतुदींचे संकलन नाही, तर आधुनिक समाजाला आरसा दाखवणारे विधेयक आहे. ते आपल्याला विचारायला भाग पाडते. आपण कामासाठी जगतो आहोत की जगण्यासाठी काम करतो आहोत? काम आणि आयुष्य यांच्यातील सीमारेषा पुन्हा स्पष्ट करणे, मानवी प्रतिष्ठेला प्राधान्य देणे आणि तंत्रज्ञानावर माणसाचे नियंत्रण प्रस्थापित करणे हा या विधेयकाचा गाभा आहे. समाजाने, उद्योगांनी आणि शासनाने मिळून हा विचार स्वीकारला, तरच राईट टू डिस्कनेक्ट हा केवळ कायद्यातील शब्द न राहता प्रत्यक्ष जीवनातील अनुभव बनेल.

# भक्तिमार्ग

## देवशोधनाविषयी...

सहाव्या दशकातल्या पहिल्या समासात समर्थ रामदास देवशोधनाबाबतचे विचार मांडतात. रामदास स्वामी म्हणतात, चित्त सुचित करावे। बोलिलें ते जीवीं धरावे। साधव होऊन बैसावे। निमिष्य येक।।१।। कोणी येक ग्रामी अथवा देसी। राहणे आहे आपणासी। न भेटता तेथल्या प्रभूसी। सौख्य कैचे।।२।। म्हणौन ज्यास जेथे राहणे। तेणें त्या प्रभूची भेटी घेणे। म्हणिजे होय श्लाघ्यवाणे। सर्व काही।।३।। पहिल्या ओवीत ते म्हणतात की मी जे सांगतो आहे ते चित्त एकाग्र करून ऐकायला हवं. हे सगळं हृदयात धरून ठेवायला हवं. इथे क्षणभर सावध होऊन बसा आणि मी जे सांगतो आहे ते ऐका. पुढच्या ओवीचा संदर्भ असा की, आपण कामानिमित्ताने किंवा अन्य काही कारणांनी एखाद्या गावात, शहरात किंवा देशात राहतो. पण त्या गावातल्या देवतेला किंवा अधिपतीला भेटत नाही, त्याचं दर्शन घेत नाही. यावर ते भाष्य करतात. रामदास म्हणतात की, आपण ज्या देशात राहतो तिथल्या देवाला, अधिपतीला किंवा अधिकाऱ्याला भेटायला हवं. त्याशिवाय सुख प्राप्त होणार नाही. ज्याला जिथे रहायचं असेल तिथल्या मुख्य अधिपतीची भेट घ्यायला हवी. यामुळे सर्व काही सुरळीत होतं.



प्रभूची भेटी न घेता। तेथे कैची मान्यता। आपुले महत्त्व जाता। वेळ नाही।।४।। म्हणूनि रायापासोनि रंक। कोणी येक तरी नायेक। त्यास भेटणे हा विवेक। विवेकी जाणती।।५।। त्यास न भेटता त्याचे नगरी।राहाता धरितील बेगारी। तेथ न करिता चोरी। आंगी लागे।।६।। चौथ्या ओवीत रामदास म्हणतात, मुख्य अधिपतीची भेट घेतली नाही तर आपल्याला कोणीही मानणार नाही. यामुळे आपलं महत्त्व नाहीसं व्हायला वेळ लागणार नाही. रामदास स्वामी उपदेश करतात की, राजापासून रंकापर्यंत नगराचा अधिपती कोणीही असला तरी त्याची भेट घ्यायला हवी. त्याला न भेटता त्याच्या नगरी राहिले तर वेठबिगारीला लावलं जाईल. चोरी केली नसताना चोरीला आरोप लावला जाईल. त्यामुळे नगराधिपतीला भेटणं योग्य ठरतं. समार्थांची ही शिकवण आजच्या काळातही उपयुक्त ठरते. नगरातल्या प्रभावशाली व्यक्तिमत्त्वांशी सख्य असणं लाभदायी ठरू शकतं.

दासबोधातून...

## इथे होतो देवत्वाचा भास

भक्ती लेख

प्रत्येकाचं एक आराध्य दैवत असतं. त्यावर आपली दृढ श्रद्धा असते. मीदेखील देवाचं अधिष्ठान मानते. त्याच्या कृपेवर हे जग चाललं आहे यावर माझा विश्वास आहे. आईचं कुलदैवत म्हणजे शांतादुर्गा मंगेश तर सासरी एकवीरा देवी आणि खंडोबा ही कुलदैवतं आहेत. आम्ही तुळजाभवानीचेही भक्त आहोत. आमच्या घरात विशेषत: आदिशक्तीची उपासना होते. एकप्रकारे शाक्तपूजा होते. पण या शक्तीपूजेबरोबरच गुरुचा आशीर्वाद असणं महत्त्वाचं असतं असं मला वाटतं. सद्गुरु तुम्हाला दत्तात्रयापर्यंत पोहोचवतात. आपल्यावर येणारी प्रत्येक आपत्ती, प्रत्येक संकट सद्गुरु आपल्या शिरी घेतात आणि रक्षणकर्ते होऊन सदैव पाठीशी उभे राहतात. सद्गुरु प्रसन्न असतील तर देवही प्रसन्न होतो असं वाटतं. देव आणि भक्त यातील दुवा म्हणून, साकव म्हणून गुरु भूमिका बजावत असतात. म्हणूनच माझ्यालेखी गुरुचं स्थानही महत्त्वाचं आहे. गणपतीवरही माझी निस्सीम श्रद्धा आहे. त्याच्याशिवाय मी आयुष्याकडे पाहू शकत नाही. आणि या सगळ्यांबरोबरच मी कालीची उपासक आहे. आपल्या भागात कालीच्या उपासकांची संख्या कमी आहे. काली म्हटलं की अरे बापरे...! असे उद्गार बाहेर पडतात. दुर्दैवाने आपल्या समाजात या देवतेबद्दल विनाकारण चुकीच्या संकल्पना आहेत, या देवतेबद्दलची अनाठायी भीती आहे. काली म्हणजे तंत्र-मंत्राची देवता असा समज असतो. पण माझ्या मते, प्रत्येक देवतेची तंत्रपूजा असतेच. ही पूजा सगळ्यांकडून होत नसल्यामुळे ती फारशी प्रचलित नाही इतकंच. तंत्रसाधकांनी या देवीची पूजा केल्यामुळे तिची हीच ओळख समाजामध्ये रुढ झाली. तिच्याबद्दल एक भीती आहेच पण दुसरीकडे या देवतेविषयी आकर्षणही आहे. पण इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर मी हे खात्रीशीर सांगू शकते की, कालीमातेइतकी प्रेमळ देवता खचितच कोणती असेल. मला ती कायमच एका लहान मुलासारखी निखळ आणि निरागस भासते. भक्तांनी आपल्या निकट रहावं, आपलं बनून रहावं अशी तिची धारणा असते. मुलाने आपल्याकडेच लक्ष द्यावं असा एखाद्या आईचा आग्रह असतो तसाच भक्ताबद्दल कालीचा असतो असं मला नेहमी जाणवतं. पण कालीसमोर तुम्ही हुशारी करुन उपयोग नाही. तुम्ही तिच्यापुढे नतमस्तकच व्हायला हवं. इथे तुमचा अहमं चालत नाही. तुम्ही स्वत:ला पूर्णपणे समर्पित करायचं, सगळा भार तिच्यावर सोपवायचा आणि तूच मला तार, अशी साद घालत तिचा आसरा घ्यायला... अशा अनन्य भावाने शरण गेलेल्या भक्ताला सर्वात लवकर जवळ करणारी, त्याची काळजी घेणारी ही देवी आहे असं मला वाटतं. किंबहुना हे मी अनुभवावरुन सांगू शकते. स्वत:चं डोकं न लढवता, जास्त हुशार न बनता नतमस्तक होणाऱ्यांवर ती कृपादृष्टी करतेच.



ही साधारणत: १९८३ ची गोष्ट आहे. मी मुलीला जन्म दिला होता. कवितानंतरच आमचं हे बाळ... आम्ही तिचं नाव चंदना ठेवलं. पण जन्मापासून ती आजारांच्या विळख्यात सापडली आणि अवघ्या २५ दिवसांची असताना देवाघरी गेली. या घटनेने मी अंतर्बाह्य हादरले. अपत्यनिधनाचा तो आघात मी सहन करु शकले नाही. या दु:खातिरेकाने मला नैराश्यग्रस्ततेचा

**मी कालीमातेची उपासक आहे. बहुतेकांच्या मनात या देवतेबद्दल भीती असते. पण एका विव्हल क्षणी मी कालीला शरण गेले, आयुष्य तिला समर्पित केलं आणि त्यानंतर तिनेच माझा सांभाळ केला. या देवतेप्रमाणेच माता-पित्यांमध्ये मला देवत्वाचा साक्षात्कार होतो. कोणी निखळ, निर्व्याज मनाने सामोरा येतो तेव्हा त्यातही देवाचा अंश दिसतो. कुटुंबातील स्नेहबंधामध्येही त्याचं रुप दिसतं. तो मला जागोजागी भेटतो.**

आजार जडतोय की काय अशी शक्यता निर्माण झाली. त्याच वेळी दखिनादा नावाच्या कालीभक्त संगीतकारांनी मला कालीचं दर्शन घेण्याचा सल्ला दिला. 'माँ के पास जावो' असं सांगताच मी कोलकात्याला गेल्यावर कालीघाटला जाते असं त्यांना सांगितलं. तेव्हा त्यांनी, 'तुम दक्षिणेश्वर जाओ' असं आग्रहाने सांगितलं. इथे रामकृष्ण परमहंसांनी कालीमातेची आराधना केली होती. 'तिथे तू काहीही बोलू नकोस, तिला सांग मी तुझ्याकडे आले आहे. माझी काळजी घे.' असं त्यांनी सांगितलं आणि तो सल्ला मानून मी कालीला शरण गेले. तो दिवस आणि आजचा दिवस... एक क्षणही तिच्याशिवाय माझा विचार करु शकत नाही. त्या क्षणापासून तिने माझा स्वीकार केला आणि आमच्यामध्ये एक नितांतसुंदर अद्वैत साधलं गेलं.

काली ही अशी देवता आहे जी जग उलथटून टाकू शकते. ती क्षमता तिच्यात आहे. साक्षात शंकराने आपलं हृदयकमळ तिला अर्पण केलं आहे. या हृदयकमळावर तिचे चरण विराजमान आहेत. कालीने शंकराच्या छातीवर पाय दिला, तिला शांत करण्यासाठी शंकराने तिच्यापुढे स्वत:ला झोकून दिलं अशा आख्यायिकांवर माझा विश्वास नाही. हे सगळं कल्पनारंजन आहे असं वाटतं. शंकर म्हणजे शव अधिक इकार. यातील इकार ही काली म्हणजेच शक्ती आहे. ज्यावेळी शिवाच्या हृदयाला शक्तीचा स्पर्श होतो त्यावेळी ब्रह्मांडाची निर्मिती होते. त्यातून शक्ती काढली तर शव उरतं. म्हणूनच शिवाच्या हृदयाला कालीचा पाय लागतो तेव्हा चराचराचं वर्तूळ पूर्ण होतं. म्हणूनच शिव-शक्तीला आपण ब्रह्मांडरुप मानतो. अशा या शक्तीपाशी, कालीपाशी मी नतमस्तक होते.

आत्तापर्यंतच्या आध्यात्मिक प्रवासात मी बरीच व्रतवैकल्य, पूजापाठ, होमहवन केलं. पण प्रगल्भता वाढली तसं कळालं की निस्सीम प्रेमानं, भावनेनं तुम्ही ईश्वराशी संधान साधता, त्याच्याशी जोडले जाता तेव्हा वेगळ्या पूजेची गरजच उरत नाही. कोणी मंत्रजपाने, कोणी पठणाने, कोणी आणखी एखाद्या मार्गाने आराधना करतो. पण एका टप्प्यावर या कशाचीही गरज न उरता केवळ भाव उरतो. तो त्या शक्तीशी एकरुप झाला की द्वैत रहातच नाही. हे अद्वैत मी वेळोवेळी अनुभवते. देवीची गाणी गाताना, तिची स्तुती करताना प्रतिमेकडे बघते तेव्हा स्वत:ला पूर्णपणे समर्पित केलेलं असतं. मग आपोआप तो कृतार्थ भाव सर्वांगावर पसरतो. कोणतीही भावना जाणीवपूर्वक आणता येत नाही तर मनात फुलासारखी उमलावी लागते. अपत्याला बघून मातेच्या हृदयात प्रेम दाटून येतं आणि ती त्याला हृदयाशी कवटाळते अगदी त्याचप्रमाणे देवासमोर बसल्यावर त्याच्याप्रती शरणागत भाव जागृत होतो. तेव्हा मी त्या रुपाशी तादात्म्य पावलेली असते. हा अनुभव मी अनेकदा घेतलेला आहे.

शेवटी भक्ती हा देवापर्यंत पोहोचण्याचा, त्या दैवी शक्तीचे आशीर्वाद घेण्याचा एक मार्ग आहे. एकदा देवाने तुमचा स्वीकार केला, तुमच्याशी नातं जोडलं की प्रत्येक कृती पूजाच होऊन जाते. दिवसभर तुमच्या डोक्यात देवाचं संस्मरण राहिलं तर तुम्ही चालता ती पूजा होते, बोलता ती पूजा होते, काम करता ती देखील पूजा होते. माणसाच्या आयुष्यामध्ये हा टप्पा नक्की येतो. अर्थात त्यासाठी तुम्ही देवाला सामोरं जायला हवं. सूर्य प्रत्येकावर प्रकाशाची पखरण करत असतो. पण एखाद्याने स्वत:ला अंधाऱ्या खोलीत कोंडून घेतलं तर तो त्याचा दोष ठरतो, सूर्याचा नाही असं मी म्हणेन. देवाने ही सुंदर सृष्टी निर्माण केली आहे. आपल्याला जीवाभावाचे सगेसोयरे दिले आहेत. प्रेमळ कुटुंबीय आहेत. या सर्वांशी मिळून मिसळून वागणं, सर्वांना जोडून ठेवणं, प्रेमार्दता जपणं हीदेखील एक पूजा आहे असं मला वाटतं. आमचं कुटुंब खूप मोठं आहे. अर्थात सध्याच्या काळात ५०-६० माणसांनी एका घरात राहणं शक्य नाही. पण नवरात्रीत आम्ही सगळे एकत्र जमतो आणि मोठ्या आनंदाने देवीचा जागर करतो. एरवी आपापल्या कामात कितीही व्यग्र असले तरी सगळे जण या दिवसांसाठी वेळ राखून ठेवतात आणि एकत्र येण्याचा आनंद लुटतात. असं स्नेहसंमेलन जमावं, सुहृदांनी एकत्र यावं हादेखील देवाचा आशीर्वाद असतो असं मला वाटतं. देवाचं आणखी एक रुप मी साध्या-सरळ माणसांमध्ये पहाते. मुखवटा घालून जगणारे अनेक असतात. ते वरकरणी सर्वगुणसंपन्न असल्याचा आभास निर्माण करतात. पण कोणी एखादा अगदी निखळ आणि निर्व्याजतेने समोर येतो. त्यात माणूसपण असतं. तो माणसासारखा चिडतो, रागावतो, चुका करतो पण आपण चुकल्याची कबुलीही देतो. अपराध मान्य करतो. अशा साध्या माणसातही मला देव दिसतो. तो देव मला अधिक भावतो.

**अनुराधा पौडवाल, प्रख्यात गायिका**



## गोव्यातल्या पांडव गुहा

धार्मिक स्थळं

गोवा हे राज्य सुंदर आणि रमणीय समुद्रकिनाऱ्यांसाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी मंगेशी, शांतादुर्गा ही प्रसिद्ध मंदिरं आणि चर्चही आहेत. म्हणूनच या राज्याला आध्यात्मिक महत्त्व आहे. यासोबतच गोव्यातल्या अवर्लम गुहाही पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरतात. या गुहा पांडवकालीन असल्यामुळे त्यांना पांडव गुहा असंही संबोधलं जातं. उत्तर गोव्यातल्या बिचोलिम शहरात या गुहा आहेत. गुहेचे पाच भाग आहेत. याठिकाणी बरीच शिवलिंगही आहेत. या शिवलिंगांची स्थापना कोणी केली, याची माहिती उपलब्ध नाही. दुसऱ्या गुहेतलं शिवलिंग सूर्याला अर्पण करण्यात आलं आहे. पांडवकाळापासूनच ही शिवलिंग अस्तित्त्वात असल्याचं मानलं जातं. स्थानिक लोक शिवलिंगांची भक्तीभावाने पूजा करतात.

या गुहेजवळ गौतम बुद्धाची मोठी मूर्ती आहे. त्यामुळे बौद्ध धर्माशी या गुहेचा जवळचा संबंध असल्याचं बोललं जातं. निसर्गरम्य वातावरणात या गुहा वसल्या आहेत. त्यांची रचना आणि स्थापत्यकला साधी पण आकर्षक आहे. त्यातील भिंतींवर कोणतीही चित्रं किंवा नक्षीकाम नाही. त्या कोऱ्या आहेत. हा गुहांचं ऐतिहासिक महत्त्व वादातीत आहे. शिवाय गुहांमधली गूढता पर्यटकांना आकर्षित करण्यास पुरेशी आहे. हा परिसर नयनरम्य आहे. गुहेच्या आसपास धबधबेही आहेत तसंच रूद्रेश्वराचं मंदिरही आहे. त्यामुळे गोव्याला गेल्यावर या पांडव गुहांना भेट द्यायला विसरु नका.

## ...या गोष्टींचा मोह नको

धर्मशास्त्रातून...

माणसाला सर्व सोयीसुविधा हव्या असतात. त्याला अनेक गोष्टींचा मोह सोडवत नाही. पण कोणतीही गोष्ट शाश्वत नसते. धन असो किंवा अधिकार, आयुष्यभर आपल्यासोबत काहीही रहात नाही. त्यामुळे अशा गोष्टींचा मोह धरू नये असं गुरू शुक्राचार्य सांगतात. काय म्हणतात शुक्राचार्य? जाणून घेऊ या.



यौवनं जीवितं चित्तं छाया लक्ष्मीश्च स्वामिता। चंचलानि षडेतानि ज्ञात्वा धर्मरतो भवेत।। असं शुक्राचार्यांनी म्हटलं आहे. याचा अर्थ असा की, तारूण्य कायमस्वरूपी रहात नाही. ठराविक वयानंतर वार्धक्य येतं. चेहऱ्यावर सुरकुत्या पडतात. केस पांढरे होतात. पण मनुष्य याचा स्वीकार करू शकत नाही. त्याला कायम तरूण रहायचं असतं. दिसायचं असतं. यासाठी बरेच उपाय केले जातात. तारूण्याचा मोह ठेवला जातो. पण हे उपयोगाचं नाही. तारूण्य सरणार आहे, हे प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवं.

माणसाने जीवनाचा मोह धरू नये. कारण जीवनाचा अंत ठरलेला आहे. मृत्यू अटळ आहे. कितीही औषधोपचार केले तरी मृत्यू टळणार नाही. त्यामुळे जीवनाची आसक्ती धरू नये. माणसाचं मन खूप चंचल असतं. मनाला नियंत्रणात ठेवणं खूप कठीण असतं. अनेक जण असा प्रयत्न करतात. पण हे शक्य होत नाही. मनाला बांधून ठेवणं आपल्या क्षमतेपलीकडचं असलं तरी योग आणि ध्यानधारणेद्वारे त्यावर नियंत्रण मिळवता येतं.

माणसाची सावलीही त्याच्या सोबत नसते. वेळ आली की सावलीही साथ सोडून निघून जाते. जिथे सावलीच साथ देत नाही तिथे इतरांकडून कोणतीही अपेक्षा करता येणार नाही. माणसाला धनाची अपेक्षा असते. पैसा, संपत्ती कायम आपल्याकडे रहावी असं माणसाला वाटत असतं. पण ते शक्य नसतं. लक्ष्मीही चंचल असते. त्यामुळे धनसंचय केला तरी ते टिकून राहण्याची शाश्वती नसते.

काही लोकांना अधिकार गाजवायचा असतो. पण अधिकार, पद कायम स्वरूपी टिकून रहात नाही. परिवर्तन, बदल हा जगाचा नियम आहे. त्यामुळे कोणताही अधिकार तुमच्याकडे कायम रहात नाही. त्यामुळे अधिकाराचाही मोह धरू नये.

## भागवताचे लाभ मिळवण्यासाठी...

मंत्रजागर

धर्मशास्त्रानुसार भागवताच्या पठणाने पुण्य लाभतं. पापनाशनासाठी भागवताचं पठण केलं जातं. पण आजच्या काळात संपूर्ण भागवत पठणासाठी वेळ मिळत नाही. रोजच्या धावपळीत इच्छा असूनही हे शक्य होत नाही. अशा वेळी पुण्य कसं मिळवायचं हा प्रश्न पडतो. पण हिंदू धर्मात अनेक पर्याय उपलब्ध आहेत. एका मंत्राच्या पठणाने संपूर्ण भागवत वाचल्याचं पुण्य मिळू शकतं. या मंत्राविषयी आणि त्याच्या पठणाच्या नियमांविषयी जाणून घेऊ या.

या मंत्राला 'एक श्लोकी भागवत' असं म्हटलं जातं. आदौ देवकी देव गर्भजननं, गोपी गृहे वद्रधनम। माया पूज निकासु। ताप हरणं गौवद्रधनोधरणम। कंसच्छेदनं कौरवादिहननं कुंतीसुपाजालनम। एतद् श्रीमद्भागवतम पुराण कथितं श्रीकृष्ण लीलामृतम।। अच्युतं केशवं रामनारायणं कृष्ण: दामोदरं वासुदेवं हरे। श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकी नायकं रामचन्द्रं भजे।। असा हा मंत्र आहे.

या मंत्राचा जाप करण्याआधी शूचिर्भूत व्हा. रेशमी आणि स्वच्छ वस्त्र नेसून श्रीकृष्णाच्या फोटोची विधीवत पूजा करा. आसन अंथरून कृष्णाच्या फोटोसमोर बसा. हातात रूद्राक्षमाळ घ्या. ही माळ जपत मंत्रपठणाला सुरूवात करा. दर दिवशी पाच माळा जपा. यामुळे चांगलं फळ मिळतं. मंत्राच्या नियमित पठणाने भक्ताच्या इच्छा पूर्ण होतात. समस्या दूर होतात. यासाठी मन एकाग्र करून श्रीकृष्णाप्रती समर्पित भावना ठेवून मंत्राचा जप करायला हवा.

## हनुमानाने सीतेला का मुक्त केलं नाही?

जाणून घ्या



हनुमान हे रामायणातलं अत्यंत महत्त्वाचं असं पात्र. हनुमान म्हणजे श्रीरामाचा परमभक्त. सीतेला रावणाच्या कैदेतून मुक्त करण्याच्या कार्यात हनुमान आणि त्याच्या वानरसेनेचा मोठा वाटा होता. हनुमानाला शंकराचा अवतार मानण्यात आलं आहे. बुद्धी आणि शक्तीच्या बळावर त्याने अनेक प्रश्न चुटकीसरशी सोडवले. हनुमानाच्या बलाचे, शक्तीचे गोडवे गायले जातात. त्याने लंकेत सीतेची भेट घेतली. रावणाची लंका जाळली. असं असताना त्याने रावणाच्या कैदेतून सीतेची सुटका का बरं केली नसावी? याचं उत्तर या कथेत दडलं आहे. एकदा हनुमान आपल्या मातेला म्हणजे अंजनीला रामायणातली कथा सांगत होता.

त्यावेळी अंजनीने विचारलं, 'तू एवढा शक्तीशाली, बलवान आहेस. रावणाची लंका जाळलीस. रावणाचा नि:पात करून सीतेला कैदेतून सोडवण्याची क्षमता तुझ्याकडे होती. मग तू हे का केलं नाहीस? सीतेला सोडवून आणलं असतं तर राम-रावणाचं युद्ध टळलं असतं.' त्यावर हनुमान म्हणाला, 'माते, प्रभू श्रीरामांनी मला असं करायला सांगितलं नव्हतं. त्यांनी सीतामाईला खुणेची अंगठी द्यायला सांगितली होती. माझं कार्य प्रभू श्रीरामांना माहीत आहे. मी काय करायला हवं हे ते जाणतात. त्यांच्या आज्ञेशिवाय मी काहीही करत नाही. मी माझ्या मर्यादा जाणतो. मला त्यांचं उल्लंघन करायचं नाही.' अशा पद्धतीने हनुमानाने कायमच श्रीरामाच्या आज्ञेचं पालन केलं. म्हणून तो श्रेष्ठ भक्त ठरला. भगवंताच्या सूचनांचं तंतोतंत पालन केल्यामुळेच हनुमान श्रीरामाच्या कृपेला पात्र ठरला. श्रीराम त्याच्या हृदयात विराजमान झाले.

## गुरुच्या मार्गदर्शनाने...

स्वबोध



सद्गुरू किंवा मार्गदर्शकामुळे आपलं आयुष्य बदलू शकतं. स्वामी दयानंद सरस्वतींनीही एका माणसाचं आयुष्य बदललं. याचीच ही कथा. स्वामी दयानंद सरस्वती पंजाबमध्ये धर्मप्रचार करत होते. ते ठिकठिकाणी प्रवचनं देत असत. उपस्थित श्रोत्यांना ते परोपकारी आयुष्याचे आणि प्रामाणिकपणाचे धडे देत असत. एके दिवशी प्रवचन सुरू असताना एक माणूस तिथे पोहोचला. आपल्याला भक्तिगीत म्हणायचं आहे, त्याची परवानगी द्यावी अशी विनंती त्याने स्वामीजींना केली. अमी चंद असं त्याचं नाव होतं. स्वामीजींनी त्याला परवानगी दिली. अमी चंदचा गळा गोड होता. त्याच्या भजनाने सर्वांना मंत्रमुग्ध केलं. स्वामीजींनाही त्याची भक्तिगीतं खूप आवडली. तो निघून गेल्यावर उपस्थितांनी स्वामीजींना त्याच्याबद्दल माहिती दिली. हा माणूस तहसीलदार असून तो मद्यपान करतो, त्याने पत्नीचा त्याग केला असून परस्त्रीसोबत राहतो आणि भ्रष्टाचारही करतो, असं स्वामीजींना सांगण्यात आलं. यावर स्वामीजी काहीच बोलले नाहीत.

दुसऱ्या दिवशी अमी चंद पुन्हा आला. त्याने पुन्हा एकदा भजन ऐकवण्याची इच्छा व्यक्त केली. काहीही न बोलता स्वामीजींनी त्याला परवानगी दिली. याबद्दल सर्वांना आश्चर्य वाटलं. पण भजनं गायनानंतर स्वामीजींनी अमी चंदला जवळ बोलावलं. ते म्हणाले, 'अमी चंद तू चिखलात रूतलेला हिरा आहेस. भगवंताचा भक्त आहेस. गळा गोड आहे. पण तू दुर्गुणी आहेस. तू दुर्गुण दूर सारत नाहीस तोपर्यंत तुला पुण्य मिळणार नाही. या भक्तीचा, भजनांचा काहीही उपयोग नाही.' हे ऐकून अमी चंदला चुकीची जाणीव झाली. घरी गेल्यावर त्याने दारूच्या बाटल्या बाहेर फेकून दिल्या. परस्त्रीचा त्याग केला आणि पत्नीला घरी आणलं. तिच्यासोबत नांदू लागला. त्याने भ्रष्टाचार न करण्याचा निर्धार केला. पुढे हाच अमी चंद प्रसिद्ध भजनगायक अमी चंद मेहता या नावाने प्रसिद्ध झाला.

## संत्रा रोपवाटिका सक्षम होण्याच्या दृष्टीने राज्य सरकार अध्यादेश काढणार

# कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले निर्देश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना उत्तम व दर्जेदार रोपे मिळावी यासाठी नर्सरी अर्थात रोपवाटिका सक्षम व्हाव्यात या दृष्टीने केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात विदर्भातील शेतकरी तसेच ॲग्रोव्हिजन समितीकडून आलेल्या सूचनांचे स्वागत करून सर्वसमावेशक असा संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना बळ देणारा नर्सरी कायदा अस्तित्वात यावा याद्दष्टीने सकारात्मक निर्णय घेऊन लवकरच या संबंधित अध्यादेश काढण्याच्या सूचना राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज दिल्या.



नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत ॲग्रोव्हिजनची संत्रा नर्सरी धोरण समिती, राज्याचा कृषी व फालोत्पादन विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ व एन. आर. सी. सी. यांची संयुक्त बैठक रविवारी पार पडली. या बैठकीला राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, अतिरिक्त मुख्य सचिव विकास रस्तोगी, कृषी आयुक्त पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, एनआरसीसीचे डॉ. दास, ॲग्रोव्हिजनचे सल्लागार डॉ. सी. डी. मायी, आमदार चरणसिंग ठाकूर, आमदार उमेश यावलकर, श्रीधर ठाकरे, रवींद्र बोरटकर, मोरेश्ववर वानखेडे, सुधीर दिवे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत सुरुवातीला बोलताना नितीन गडकरी म्हणाले, 'महाराष्ट्रात फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियमन १९६९ या अन्वये शेतकऱ्यांना फळांची निरोगी रोपे आणि दर्जेदार वाढणारी रोपे मिळावी हा उद्देश आहे. फळबागांमध्ये प्राथमिक रोपाचे अनन्य साधारण महत्त्व आहे; कारण फळबाग वाढीस चार-पाच वर्ष लागतात आणि जर चांगली रोपे त्यांना मिळाली नाही तर शेतकऱ्याचे अत्यंत नुकसान होते.

अतिशय गंभीर बाब असून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या भविष्याचा प्रश्न या विषयाशी जोडला गेलेला आहे.

त्यामुळे उत्तम प्रकारची रोप मुळे तयार होणे ही काळाची गरज असून त्याद्दष्टीने राज्य सरकारने नियमांमध्ये बदल करून नर्सरी उत्तम प्रकारची असावी यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. त्या अनुषंगाने काही सुधारणा ॲग्रोव्हिजन समितीच्या माध्यमातून तज्ज्ञ शेतकऱ्यांनी सूचविल्या आहेत ; त्या सूचनांचा विचार कृषी विभागाने करावा.' या सर्व सूचनांचा अंतर्भाव करून व राज्य शासनाचा कृषी विभाग आणि पीकेव्हीच्या माध्यमातून दर्जेदार रोपवाटिका व रोपमळे यासंदर्भात डॉ. शशांक भराड, डॉ. पंचभाई आणि सहसंचालक कृषी यांच्याकडून यावेळी मंत्र्यांसमोर सादरीकरण करण्यात आले. या सर्व सादरीकरणानंतर विस्तृत चर्चा झाली व केंद्रीयमंत्री गडकरी यांच्या सूचनेप्रमाणे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने तसेच उत्तम नर्सरी नियोजनाच्या दृष्टीने पुढील अध्यादेश काढण्याच्या सूचना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी बैठकीच्या शेवटी अधिकाऱ्यांना दिल्या.

## तीन माओवाद्यांचे शस्त्रासह गोंदिया पोलिसांसमक्ष आत्मसमर्पण



■ महासागर प्रतिनिधी
गोंदिया, दि. १४ :

गोंदिया जिल्हा पोलिस दलासमक्ष दर्रेकसा एरिया कमांडरसह दोन एसीएम माओवाद्यांनी स्वतः जवळली शस्त्रासह शनिवार १३ डिसेंबर रोजी आत्मसमर्पण केले. रोशन उर्फ मारा इरिया वेडजा (३५, रा.मेंढरी जि.बिजापूर), सुभाष उर्फ पोज्जा बंडू रव्वारा (२६, देरापल्ली जि.बिजापूर) व रतन उर्फ मनकू ओमा पोयम पोयाम (२५, रा.रेखापाल जि.नारायनपूर) असे आत्मसमर्पन केलेल्या माओवाद्यांची नावे आहेत.

राज्य शासनाने २००५ पासून जाहीर केलेल्या आत्मसमर्पण योजनेमुळे तसेच हिंसाचाराच्या जीवनाला कंटाळून वरिष्ठ माओवाद्यांसह अनेक जहाल माओवाद्यांनी आजपर्यंत जिल्हा पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले आहे. २८ नोव्हेंबर रोजी एमएमएसी झोनमधील स्पेशल झोनल कमेटी मेंबर विकास उर्फ अनिल उर्फ नवज्योत नागपुरे उर्फ रमेश सायत्रा भास्कर लिंगय्या रामस्वामी याच्यासह ११ जहाल माओवाद्यांनी गोंदिया पोलिस दलासमोर आत्मसर्मपण केले होते. दर्रेकसा एरिया कमेटीचे उर्वरित काही माओवादी सदस्य आत्मसमर्पण होणे बाकी होते. त्या अनुषंगाने गोंदिया पोलिस दलाचे उर्वरित माओवाद्यांना आत्मसमर्पण करण्यासाठी प्रयत्न सुरू होते.

त्याचे फलीत म्हणजे, १३ डिसेंबर रोजी एमएमसी झोन मधील दर्रेकसा एरिया कमेटी कमांडर रोशन याच्यासह दोन एसीएम सदस्यांनी जिल्हा पोलिसासमक्ष आत्मसमर्पण केले. यात राज्य शासनाने रोशनवर ८ लाख रुपए, सुभाष व रतनवर प्रत्येकी ६ लाख रूपयांचे बक्षीस जाहीर केले होते. जिल्हा पोलिस दलासमोर रोशनने एसएलआर शस्त्र, दोन मॅगझीन व २५ राऊंडसह, सुभाषने एसएलआर शस्त्र, २ मॅगझीन व २३ राऊंडसह तर रतनने ८ एमएम शस्त्र, १ मॅगझीन व १५ राऊंडसह आत्मसमर्पण केले.

आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांना राज्य शासनाच्या आत्मसमर्पण योजनेतंर्गत योग्य ते पुर्नवसन करण्यात येत असून नक्षल चळवळीत सक्रिय असलेल्या नक्षलवाद्यांना शस्त्र सोडून मुख्य प्रवाहात येण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## खोटे भरडाई क्षमता प्रमाणपत्र सादर करणाऱ्या राईसमिलर्सवर फौजदारी गुन्हे दाखल करा

# किशोर कऱ्हाडेची प्रधान सचिवांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी
देसाईगंज, दि. १४ :

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शासन शेतकऱ्यांकडून हमी भावाने धान खरेदी करीत असते.दरम्यान राईसमिलर्सना धान भरडाई करीता देतांना संबंधित राईसमिलची प्रत्यक्षात भरडाई क्षमता तपासूनच भरडाई करीता धान देण्याच्या संबंधित अभिकर्ता संस्थेच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. भरडाई करीता जास्त धानाची उचल करण्यासाठी राईसमिलर्स खोटे भरडाई क्षमतेचे प्रमाणपत्र सादर करीत आहेत.मात्र संबंधीत अधिकारी भरडाई करीता देण्यात येत असलेल्या राईसमिलची प्रत्यक्षात कोणतीही भरडाई क्षमता न तपासता क्षमतेपेक्षा अधिक धान देऊन संगनमताने शासनाला कोट्यावधी रुपयाने चुना लावत आहेत. ही गंभीर बाब लक्षात घेता शासनाला खोटे भरडाई प्रमाणपत्र सादर करणाऱ्या व संबंधित राईसमिलर्सची कोणतीही भरडाई क्षमता तपासणी न करता क्षमतेपेक्षा कितीतरी पटीने अधिक भरडाई करीता धान देणाऱ्या संबंधित अभिकर्ता संस्थेच्या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या लेखी तक्रारीतुन केली आहे.

दिलेल्या तक्रारीत कऱ्हाडे यांनी नमूद केले आहे की पणन हंगाम २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये खरेदी केलेल्या धानाची भरडाई व राईस फोर्टिफिकेशन बाबत अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन परिपत्रक क्र-धानभ१३२४/प्र.क्र-१६७/ना.पु-२९ मंत्रालय मुंबई दि.२२ नोव्हेंबर २०२४ व धान भरडाई परिपत्रक क्र.धानभ-१३२५/प्र.क्र १८३/नापु.२९ दि.२० नोव्हेंबर २०२५ पणन हंगाम २०२४ -२५ मधिल मुद्दा क्रमांक ५.१३ नुसार व पणन हंगाम २०२५- २६ मधिल मुद्दा क्रमांक ५.१५ नुसार धान भरडाई करीता देतांना गिरणीधारकाच्या भरडाई क्षमतेचा प्रामुख्याने विचार करावा असे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईच्या परिपत्रकात नमुद आहे. परंतु गडचिरोली जिल्ह्यातील राईसमिलर्स प्रत्यक्षात असलेल्या भरडाई क्षमतेपेक्षा जास्त भरडाई क्षमतेचे खोटे प्रमाणपत्र शासनाला सादर करून प्रत्यक्षात असलेल्या भरडाई क्षमतेपेक्षा जास्त धान भरडाई करीता घेतात व भरडाई करीता घेतलेला धान भरडाई न करता संबंधित अभिकर्ता संस्थेच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून काळ्या बाजारात विक्री करतात. त्यामुळे पणन हंगाम २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये गिरणीधारकानी दिलेल्या भरडाई प्रमाणपत्राची प्रत्यक्ष असलेल्या भरडाई क्षमतेसोबत त्रयस्थ विभागाच्या उच्च अधिकाऱ्यामार्फत प्रत्यक्ष धान भरडाई क्षमतेची पडताळणी करण्यात यावी. तसेच प्रत्यक्षात धान भरडाई क्षमता तपासणी न करता जास्तीचे धान राईसमिलर्सना भरडाई करीता देणाऱ्या संबंधित अभिकर्ता संस्थेच्या अधिकाऱ्यांना कर्तव्यात कसूर केल्या प्रकरणी तात्काळ निलंबित करून बडतर्फ करण्यात यावे.

## यशवंत स्टेडियमवर शिक्षकांचे लोटांगण
## ४ आंदोलकांची प्रकृती खालावली

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

विधिमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशीही रविवारी यशवंत स्टेडियमवर तणावाची परिस्थिती निर्माण झाली. वेतनासाठी अन्नत्याग करत उपोषणाला बसलेल्या आणखी ४ शिक्षकांची प्रकृती खालावल्याने आंदोलक सैरभैर झाल्याचे पहायला मिळाले. शालार्थ ओळखपत्र घोटाळा समोर आल्यापासून राज्य सरकारने शिक्षकांचे वेतन थांबवले आहे. त्यामुळे उपासमार होत असल्याचा आक्रोश करत शिक्षकांनी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून अन्नत्याग पुकारले आहे. यात आणखी ४ शिक्षकांची रविवारी सकाळी खालावली. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यामुळे संतापलेल्या शिक्षकांनी पुन्हा जोरदार घोषणाबाजी केली. या घडामोडीत शिक्षण विभागाच्या उपासंचालिका माधुरी सावरकर यांनी यशवंत स्टेडियमवर येऊन आंदोलकांची समजूत काढली. त्यांनी शालार्थ ओळखपत्रा संदर्भात म्यूट आदेश, प्रस्ताव, वेतन मंजुरी शालार्थचा मसुदा सादर केल्यास वेतन काढू, असे आश्वासन दिले.

# वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १४ :

वाघाने शनिवारी सिंदेवाही तालुक्यात कापूस वेचणाऱ्या महिला शेतकऱ्याला ठार केल्यानंतर रविवारी संरक्षित वनक्षेत्रात गुरे चराईसाठी गेलेल्या गुराख्यावर वाघाने हल्ला करून ठार केले. मृत गुराख्याचे नाव पीतांबर गुलाबराव सोयाम (३६) रा.बेलघाटा असे आहे. दरम्यान चोवीस तासात वाघाने दोन जणांचा बळी घेतल्याने या वर्षी आतापर्यंत वाघाच्या हल्ल्यात ४४ जण मृत्युमुखी पडले आहेत. मूल तालुक्यातील बेलाघाट येथील रहिवासी असलेला पीतांबर हा नेहमी प्रमाणे शनिवारी गावातील गुरे चराईसाठी जंगलाच्या दिशेने गेलेला होता. संरक्षित वन क्षेत्रात कम्पार्टमेंट नंबर १७६५ मध्ये गुर चरत असताना त्याठिकाणी दबा धरून बसलेल्या वाघाने पीतांबर वर हल्ला करून त्यास जागीच ठार केले.


## नागपूर शहरातील विविध विकास कामांचा लोकार्पण व भूमिपूजन समारंभ

**सोमवार, दिनांक 15 डिसेंबर 2025**

महाराष्ट्र राज्यातील नागपूर-जबलपूर मार्गावरील जुना राष्ट्रीय महामार्ग क्र. 44 अंतर्गत नागपूर शहरात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया चौक ते ऑटोमोटिव्ह चौक मेट्रो स्थानकापर्यंत चार पदरी सिमेंट काँक्रिट रस्त्याचे बांधकाम. लांबी : 6.14 कि. मी. । किंमत : रु. 150 कोटी
वेळ : सकाळी 10.00 वाजता । स्थळ : गड्डीगोदाम चौक, सदर, कामठी रोड, नागपूर

महाराष्ट्र राज्यातील नागपूर भंडारा रोड (जुना राष्ट्रीय महामार्ग) वरील राम मंदिर ते प्रजापती नगर पर्यंतच्या सेंट्रल एव्हेन्यू रस्त्याचे काँक्रीट व्हाईट टॉपिंगसह सुधारणा आणि पदपथ पुनरुज्जीवन.
लांबी : 6.1 कि. मी. । किंमत : रु. 150 कोटी
वेळ : सकाळी 11.00 वाजता
स्थळ : टेलिफोन एक्सचेंज चौक, सीए रोड, नागपूर

नागपूर सुधार प्रन्यासची खालील विकास कामे
1. मौजा अंबाझरी येथील सांस्कृतिक संकुल
2. मौजा बिडीपेठ येथे जलतरण तलावाचे बांधकाम
3. संत जगनाडे स्मारक व आर्ट गॅलरीचे बांधकाम
4. रेशीमबाग मैदानातील विविध विकास कामे
5. गोंड राजांच्या समाधी स्थळाचे सौदर्यीकरण
एकूण किंमत : रु. 1000 कोटी । वेळ : सकाळी 11.30 वा.
स्थळ : स्थळ : हरिहर मंदिर, लकडगंज पोलीस स्टेशन समोर, नागपूर

नागपूर महानगर पालिका अंतर्गत
नागपूर शहरातील पूर्व, पश्चिम, मध्य, दक्षिण, दक्षिण-पश्चिम व उत्तर नागपूर तसेच कामठी विधानसभा क्षेत्रातील शहरी भागातील विविध विकास कामे । एकूण किंमत : रु. 1505 कोटी
वेळ : सकाळी 11.30 वाजता । स्थळ : हरिहर मंदिर, लकडगंज पोलीस स्टेशन समोर, नागपूर

महारेलच्या राज्यातील एकूण 12 रेल्वे उड्डाणपूलांचा उद्घाटन समारंभ
एकूण किंमत : रु. 607 कोटी । वेळ : सकाळी 11.30 वा.
स्थळ : हरिहर मंदिर, लकडगंज पोलीस स्टेशन समोर, नागपूर
महारेल तर्फे नागपूर शहरामध्ये सुरु असलेली प्रगती पथावरील कामे
एकूण किंमत : रु. 1615 कोटी



शुभहस्ते
मा. ना. श्री. नितीनजी गडकरी
केंद्रीय मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग
भारत सरकार

अध्यक्ष
मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

विशेष अतिथी
मा. ना. श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे
महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री
नागपूर जिल्हा

प्रमुख उपस्थिती



श्री. दयाशंकर तिवारी, मा. शहर अध्यक्ष | श्री. दत्ता मेघे, मा. माजी खासदार | डॉ. विकास महात्मे, मा. माजी खासदार | श्री अजय संचेती, मा. माजी खासदार | श्री. कृष्णा खोपडे, मा. आमदार | श्री. मोहन मते, मा. आमदार | श्री. प्रविण दटके, मा. आमदार



श्री. संदीप जोशी, मा. आमदार | श्री समीर मेघे, मा. आमदार | डॉ. परिणय फुके, मा. आमदार | श्री. विकास कुंभारे, मा. माजी आमदार | श्री. नागो गाणार, मा. माजी आमदार | प्रा. अनिल सोले, मा. माजी आमदार | श्री. गिरीश व्यास, मा. माजी आमदार



श्री. सुधाकर देशमुख, मा. माजी आमदार | श्री. सुधाकर कोहळे, मा. माजी आमदार | श्री. नाना शामकुळे, मा. माजी आमदार | श्री. अशोक मानकर, मा. माजी आमदार | डॉ. मिलींद माने, मा. माजी आमदार

शहर महामंत्री : श्री. श्रीकांत आगलावे, श्री. रितेश गावंडे, श्री. संदीप जाधव, सौ. मनिषा धावडे । संपर्क मंत्री : श्री. विष्णू चांगदे । सह संपर्क मंत्री : श्री. नरेन्द्र (बाल्या) बोरकर

मंडळ अध्यक्ष । पूर्व नागपूर : वर्धमान नगर : राजेश ठाकुर, वाठोडा : राजेन्द्र गोतमारे, पारडी : प्रदिप पोहाणे
पश्चिम नागपूर : झींगाबाई टाकळी : अमर खोडे, धरमपेठ : विनय दाणी, सुरेन्द्र गड : विनोद बघेल । उत्तर नागपूर : नारा नारी : संजय चौधरी, कळमना : शेषराव गोतमारे, वैशाली नगर : अमित पांडे, बाळाभाऊ पेठ इंदोरा : ओमप्रकाश इंगळे । दक्षिण नागपूर : जानकी मंडळ : शशांक खेकरे, हनुमान मंडळ : किरण दातीर, अयोध्या मंडळ : प्रकाश यादव । दक्षिण पश्चिम नागपूर : त्रिमुर्ती नगर : ईश्वर ढेंगळे, नरेन्द्र नगर : महेन्द्र भूगावकर, धंतोली : विनोद शिंदे, सुभाष नगर : दिलीप दिवे । मध्य नागपूर : गांधीबाग मंडळ : ॲड. संजय बालपांडे, इतवारी मंडळ : श्याम चांदेकर, महाल मंडळ : अनिल मानापूरे

आपण सर्व सादर आमंत्रित आहात..! स्वागतोत्सुक : सर्व पदाधिकारी व कार्यकर्ता गण भारतीय जनता पार्टी, नागपूर महानगर